# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय: मा. स्थायी समिती सभा दि: २८/०३/२०१५ स: ११:०० वाजता प्रकरण क्र - १३९ ते १४३

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

१० (circled)

१४/१५

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/०१/२०१५.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- १७ दिनांक २०/०१/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २८/०१/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १७, दि. २०/०१/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १७, दि. २०/०१/२०१५ सोबतची विषय पत्रिका**
**सभा बुधवार दि. २८/०१/२०१५**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| १३९ | दि. ३१/१०/२०१४ व दि. ०९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज -** |
| १४० | नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम. (फेरसादर) |
| १४१ | पुर्नविनियोजन प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. (फेरसादर) (लेखा विभाग) |
| १४२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करावयाच्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| १४३ | सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने, स्मशाने, मैदाने व रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामाच्या वार्षिक निविदेस मान्यता देणेबाबत. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- २०/०१/२०१५.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. स्थायी समिती सभा

# दि. ३१/१०/२०१४

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ३१/१०/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ३१/१०/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १३, दि. २७/१०/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. शरद केशव पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सभापती |
| २. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ४. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ५. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ६. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| ७. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ८. | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| ९. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| १०. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ११. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| १२. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| १३. | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| २. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ३. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरूवात करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ३१/१०/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १३, दि. २७/१०/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ८७, दि. ११/०७/२०१४ व दि. १८/०७/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**राजेंद्र जैन :-**

सचिव साहेब, २ नं. पेज पे खांबित साहबने बोला है रिलायन्स सोबत आपला करार झालेला नाही. तो अभी तक करार हुआ है या नही।

**शिवाजी बारकुंड :-**

रिलायन्स सोबत ३ वेळा बैठक झाली. अंतिम बैठक सोमवारी ११ वाजता आहे. त्या २-३ दिवसामध्ये अंतिम होईल त्याच्यावर रिलायन्स अधिकारी आणि मनपाचे अधिकारी ह्यांच्या ३-४ बैठका झाल्या.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, रिलायन्स ॲग्रीमेन्ट का मुद्दा मैने देढ साल पहले महासभा में उठाया था। तभी काकाणी साहब ने बोला था की मैं चर्चा करके मै खुद आपको बुला के चर्चा करूँगा। जब भी मै गया वो बोले मैं करता हूँ। उनकी ट्रान्सफर हो गई वो कर नही पाए। आपने ३ बार मिटींग कर ली जिस विषय पे हम को चर्चा करनी थी जो अधिकार देने थे आप किस पॉईन्ट पे चर्चा कर रहे है। हमको मालूम नही है। हमारे पॉईन्ट इन्क्लूड है की नही है। कम से कम आप जो बिंदू है उसपर क्या चर्चा कर रहे है वो तो स्थायी समिती के सामने रखे।

**शिवाजी बारकुंड :-**

ज्या विषयावर चर्चा होणार आहे. त्याची माहिती स्थायी समितीला देऊ. सन्मा.सदस्य आपणाला विनंती करतो आपले जे मुद्दे होते ते सगळे मुद्दे इन्क्लूड आहेत. तरी पण काय चर्चा झाली ते राईटिंगमध्ये मी देतो.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय आज विषय आहे की रिलायन्स सोबत करार झालेला नाही. आपण त्यांना पॅनल्टी लावू शकत नाही. करार झाला नाही पॅनल्टी लावू शकत नाही मग ती काम वंचित आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

हा मुद्दा पण त्याच्यात इन्क्लूड आहे. आपण प्रपोजल दिल्यानंतर त्यांनी किती दिवसात पोल लावायला पाहिजे. त्यांचे वर्षाचे टार्गेट आहे किंवा त्याला पॅनल्टी क्लॉज इम्पोज केलेला आहे. १ महिना २ महिन्यात नाही झालं तर पॅनल्टी काय असणार ते क्लॉज इन्क्लूड आहेत.

**प्रशांत दळवी :-**

जो पर्यंत ॲग्रीमेंट करार होत नाही तोपर्यंत हे सगळ लावू शकत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

ॲग्रीमेंट नव्हत जसे साहेबांनी सांगितले ती प्रोसेस चालू झाली. तीन वेळा चर्चा झाली. आपले विधी अधिकारी त्याचे अधिकारी आणि आपले टेक्नीकल अधिकारी, सोमवारी अंतिम बैठक आहे.

**प्रशांत दळवी :-**

साहेब त्यामुळे काम थांबली आहेत का?

**शिवाजी बारकुंड :-**

नाही आता आपण त्यांना प्रपोजल देतो. आपण पत्र दिले की, ह्या ठिकाणी स्ट्रिट लाईट बसवा. त्यांनी २ महिने, ४ महिने, ६ महिने बसवले नाही त्यांना काहीच पॅनल्टी नाही. आता ह्या ॲग्रीमेंटमध्ये आपण उल्लेख केलेला आहे की एवढ्या दिवसात हे काम केले नाही तर त्याला काय पॅनल्टी असणार आहे.

**प्रशांत दळवी :-**

साहेब गेल्या १ वर्षापासून जिथे दिवे बसवणार होते त्या ग्राऊंडचे ओपनिंग पण बाकी आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

कुठले आहे ते सांगा.

**प्रशांत दळवी :-**

छोट नाना-नानी पार्क.

**शिवाजी बारकुंड :-**

जे असेल ते प्रायोरिटीवर करुन घेतो.

**राजेंद्र जैन :-**

साहब उसमें हमारा एक पॉइंट था जो स्ट्रिट लाईट का रेन्ट है। यह कर्मशियल नही रेसिडेन्शीयल लगना चाहिए।

**शिवाजी बारकुंड :-**

वो भी है। वो लोग का कर्मशियल और रेसिडेन्शीयल उसके बिचमें एम.आर.सी. में कुछ नाम निकाला है। उसके उपर डिस्कशन है आपको पूरा कॉपी देते है।

**राजेंद्र जैन :-**

आपने अपना पक्ष ऐसा है की रजिस्ट्रेशन नहीं होना चाहिए।

**शिवाजी बारकुंड :-**

अपना पक्ष तो ऐसा है की, जितना अपना प्रॉपर्टी है वो १०० टक्का रेसिडेन्शीयल होना चाहिए।

**राजेंद्र जैन :-**

आपने रिलायन्स से कॉऑर्डिनेशन कमिटी बनाई है। वह कमिटी में कौन-कौन है।

**शिवाजी बारकुंड :-**

सिटी इंजिनिअर, एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, वॉटर सप्लाय, एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, पी.डब्ल्यू.डी.

**राजेंद्र जैन :-**

यह कमिटी कब बनाई।

**शिवाजी बारकुंड :-**

कमिटी पहले ही बनी है।

**राजेंद्र जैन :-**

सर्क्युलर कब निकला।

**शिवाजी बारकुंड :-**

उसकी डिटेल जानकारी देते है।

**राजेंद्र जैन :-**

पुरे मिरा भाईंदर में रिलायन्स के केबल है। वो केबल रोड पे पुरा गटर खराब है। उसकी वजह से वहाँ जगह जगह पाणी इकठ्ठा होता है। आप पॅचवर्क करते है। वह बार बार प्रॉब्लेम होता है।

**शिवाजी बारकुंड :-**

उसके पहले मिटींग भी हुआ था मेरे चेम्बर में मिटींग हुआ था। रिलायन्स के अधिकारी भी आये थे। सब इश्यू डिस्कस हो गए।

**राजेंद्र जैन :-**

आपने उनको लेटर दिया है क्या? जो केबल डाले है वह रोड पर नही डाल सकते वह पुरे रोड पर है। इसके उपर आपने कुछ रिटर्न में नोटीस दिया की कारवाई करेंगे ऐसा कुछ है क्या?

**शिवाजी बारकुंड :-**

आपको जानकारी देता हूँ।

**राजेंद्र जैन :-**

अभी तक मिरा भाईंदर में केबल लाईन उपर निचे घूम रहे है। पाणी उपर निचे लेहरे मारते है।

**शिवाजी बारकुंड :-**

यह मिटींग में बात हुँआ है।

**राजेंद्र जैन :-**

केबल डालने की परमिशन उसमे यह चीज १०० टक्के होगी। आपको यु हॅव पुर केबल बिलो द रोड, यू हॅव मेन्टेन द रोड लेवल आपने रोड मेन्टेन किया नही देखा नही। अभी आप बात उठा रहे है।

**शिवाजी बारकुंड :-**

हो जाएगा जो केबल रोड के उपर है वह निचे हो जाएगे।

**हरिश्चंद्र आमगांवकर :-**

दि. ११/०७/२०१४ व दि. १८/०७/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती महोदय एक विषय सगळ्याच्या माहितीसाठी चर्चेला यायला पाहिजे. मनपा नागरिकांना सोयी देण्याच्या दृष्टिने वाचनालय सुरू करणे. वाचनालय सुरू करतेवेळी डिपार्टमेन्टला ज्या-ज्या काही परवानग्या घ्यायला पाहिजेत. सगळ्या परवानग्या घेऊन प्रभाग ऑफिस ३ मध्ये वाचनालय सुरू झाले ते वाचनालय सुरू आहे की नाही ती माहिती पाहिजे.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो की, काकांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत आता सध्या ते वाचलानय आणि ग्रंथालय सुरू आहे. अभ्यासिकापण सुरू आहे.

**रोहिदास पाटील :-**

अभ्यासिकामध्ये ए.सी. केल्याबद्दल सभागृह तुम्हाला धन्यवाद देते. परंतू वाचनालय जागेवर नाही. वाचनालयाला मान्यता दिली सगळं झालं त्याची जागा कुठे आहे. तुम्हांला माहित आहे का? तुम्ही कधी व्हिजीट दिली होती.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

निवडणूकीपूर्वी दिलेली.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही सभा चालू असताना जा. किंवा सभा संपल्यावर जा. वाचनालय नाहीच फक्त कपाट आहेत. तुमच्या ताब्यात दिलेली जागा कोण येते. काय करते.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

वाचलानयासाठी जी जागा उपलब्ध करुन दिली होती त्यामध्ये ती जागा कमी करून प्रभाग समितीच्या अध्यक्षांना केबीन बनवली त्यामुळे जागा अपूरी पडते.

**रोहिदास पाटील :-**

प्रभाग ४ चे ऑफिस प्रभाग ४ च्या कार्यक्षेत्रातच व्हायला पाहिजे होत हे तुम्ही तात्पुरते चालू केले. प्रभाग समितीच्या सभापतीची केबीन आधीच बनली. त्याच्यानंतर हे वाढवून वाचनालय बंद करून केबीन वाढवली. हे आत्ताच आहे. तुमची परवानगी घेतली का? पहिल्यांदा चालू करते वेळी सगळ्याच्या परवानग्या घ्यायला लागल्या त्याचे लोकेशन प्लान सबमीट केला. त्या सगळ्या डिझाइन माझ्याकडे आहेत. किती बाय किती़ची जागा राहणार, किती रिडींग रुम राहणार, किती कपाट राहणार, वाचनालयामध्ये माणूस बसणार कुठे प्रिंट म्हणून सॅक्शन केल्यानंतर तुम्हाला कोणी विचारले नाही का तुम्हाला न विचारता परवानगी दिली. तुमच्या हातात असलेली प्रॉपर्टी दुसऱ्यांनी घेतली कशी घेतली तर त्याला खर्च कसा केला. प्रभाग ऑफिसमध्ये एक नळ पाहिजे त्याला चार महिने झाले. मंजूरीसाठी पाठवला आहे. नळ लिकेज होतो तो नळ लिकेज काढायला चार महिने झाले मंजुरीसाठी पाठवला आहे. अभ्यासिकेत बसायला खूर्ची पाहिजे. ९ महिने झाले तुमचा प्रस्तावच चालू आहे. टेबल पाहिजे दीड वर्ष झाले अख्ख ऑफिस कुठे गेले तुम्हाला माहित नाही.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

वाचनालयाच्या जागेवर बांधकाम विभागाने परस्पर ऑफिस तयार केले आहे. त्याबाबत ग्रंथालय विभागाला अवगत करून दिले नाही.

**रोहिदास पाटील :-**

त्याचे तुम्ही ऑब्जेक्शन द्या. लेखी आम्हाला द्या. मी सभागृहात बोललो आहे. तुम्ही लिहा आणि मला प्रत माहितीसाठी द्या. आम्ही मा.आयुक्तांना विचारतो. मा.आयुक्त साहेब विषय असा आहे की, जेव्हा परवानगी घेतेवेळी सार्वजनिक मनपा वाचनालय मी ह्यासाठी १० वेळा सभागृहात आलो, ऐसा नही मंगता, ऐसा मंगता है, त्या मुखनेने हे खोड ते खोड करून प्रस्ताव तयार करून दिला त्यानंतर वाचनालय सुरू झाले. वाचनालय कुठे गेले ह्यांना माहित नाही. हे अधिकारी आहेत ह्यांच्या अधिकारात दुसरे अतिक्रमण करतात कसे. केले तर आताच्या आता जाऊन नोटीस द्या. माहितीसाठी प्रत द्या, त्याची प्रत मला द्या असे ऑब्जेक्शन घेतले आहे की जागा जागेवरच नाही आहे. ह्याच्यात दोन गोष्टी आल्या. एक तर तुम्ही मला विचारले पाहिजे होते. त्यांनी खर्च करते वेळी त्यांनी मान्यता घ्यायला पाहिजे होती. मनात येईल तेव्हा पार्टीशन काढले. मनात येईल तेव्हा पार्टीशन हटवले. बारकुंड साहेब तुम्ही सिटी इंजिनिअर आहात तुम्ही त्या प्रभाग ऑफिसची व्यवस्था करणार की नाही करणार. प्रभाग समिती ४ ह्यांचे कार्यालय आपण तात्पुरत्या स्वरूपात प्रभाग समिती ३ मध्ये चालू केले. त्यावेळच्या सभापतींनी तुम्हाला पत्र दिले होते की आमचे कार्यालय सर्व सुविधानिशी बनवावे. माझी चार पत्र आहेत. कार्यालय तिकडे न्या. त्या वाचनालयाला अडचण होते. कार्यालय नेले नाही तर वाचनालयच बंद केले.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

मा. सभापती महोदय, प्रशासनानी चुक मान्य केली. सर्व विभागाप्रमुखांना मी निर्देश देतो की, दुसऱ्याच्या विभागात लुडबूड करायची नाही. आणि कोणाशी संबंधित काम करत असताना त्या विभागाची एन.ओ.सी. लेखी स्वरूपात प्राप्त करून घ्यावी. अन्यथा अशा प्रकारे झालेला खर्च वैयक्तिक त्या अधिकाऱ्याची, कर्मचाऱ्याची जबाबदारी असेल. ते वाचनालय उप-आयुक्तांकडे असेल, वाचनालयाचा ले आऊट आपण मंजुर केला असेल सभापतीसाठी कार्यालय बनलेच पाहिजे ह्याच्यात काही दूमत नाही. परंतु ते वाचनालय तात्पुरत्या स्वरूपात असायला पाहिजे किंवा लवकरात लवकर त्यांच्यासाठी वेगळे कार्यालय बनवून वाचनालयाची जागा रिक्त करून द्यावी. उपायुक्तांच्या जेव्हा निदर्शनास आणले तेव्हा त्यांनी मा. आयुक्तांकडे नोंदवून की साहेब ही फाईल माझ्याकडून गेली नाही हे काम करता येणार नाही. ह्याचा खर्च निषेधार्थ आहे. कारण स्टँडींग समितीकडून तिकडे वाचनालय मंजुर केलेले आहे. आज वाचनालयाचा वापर नाही आणि सभापतींना ते कार्यालय टेम्परररी असा अर्थ झाला.

**रोहिदास पाटील :-**

सभापतींची केबीन निटनेटकी बनली.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

पण वाचनालयाला डिर्स्टब झाले ना.

**रोहिदास पाटील :-**

वाचनालयाच्याच जागेमध्ये बनले पण ती चांगली बनवली त्याच्यानंतर आणखी एक्सटेन्शन केले त्यामुळे वाचनालय बंद झाले.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

सिटी इंजिनिअर साहेब ते दुरूस्त करून घ्या.

**हंसुकुमार पांडे :-**

मा.सभापती साहेब हमारा प्रभाग समिती निधी, नगरसेवक निधी जो हमारे हक्क का है। प्रभाग में काम करना चाहिए तो उसका कुछ हुआ नही।

**प्रशांत दळवी :-**

मनपाचे जे कामकाज चालू आहे ते स्थायीने बनविलेल्या बजेटप्रमाणे की मा.आयुक्तांनी केलेले बजेट आहे हे स्पष्ट करावे.

**मा. सभापती :-**

सगळ्या सदस्याच्या माहिती वारंवार मा. आयुक्त साहेबांची मिटींग घेऊन चर्चा केली. चर्चेत असे सांगण्यांत आले की हा बजेट विखंडीत करण्यासाठी पाठवला आहे त्यांच्यामुळे जो प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी हा मा.आयुक्तांच्या बजेटप्रमाणे देण्यांत येईल.

**प्रशांत दळवी :-**

स्थायीने जो बजेट मंजूर केला होता तो विखंडीत केला का?

**मा. सभापती :-**

त्याचा काय निर्णय झाला तो सांगा.

**अशरफ शेख :-**

स्टँडींग कमिटीचे बजेट विखंडीत करता येते का? ते नियम मध्ये बसते का?

**प्रशांत दळवी :-**

स्थायीने मंजुर केल्यावर महासभेला गेले पाहिजे. पण ते महासभेपुढे गेले नाही. त्यामुळे आयुक्तांचे अधिकार आयुक्तांनी वापरले आहेत. मला असे म्हणायचे आहे की ते विखंडीत करायला पाठवले आहे की परस्पर निर्णय घेण्यांत आला त्याचा खुलासा करावा.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

सभापती महोदय आपल्या ॲक्ट मधल्या तरतूदी नुसार आयुक्तांनी अंदाज तयार करायचे, मा.आयुक्तांनी केलेले अंदाज मा.स्थायी समितीसमोर सादर केले जातात. मा.स्थायी समितीने बजेट करायचे आहे मा.स्थायी समितीने जे बजेट तयार केले ते मा.महासभेने अंतिम स्वरूपात मंजुर करणे आवश्यक आहे. महासभा जो पर्यंत मंजुर करत नाही कारण काही असेल किंवा होत नाही आचारसंहिता आली म्हणून मिटींग झाली नाही किंवा अन्य कोणत्याही कारणाने जोपर्यंत महासभा बजेटला मंजुरी देत नाही. तोपर्यंत मा.आयुक्तांनी वर्तविलेले किंवा सादर केलेले अंदाज हे कायम समजण्यांत येतील त्याप्रमाणे पुढील कामकाज चालवावे. अशी जी कायद्यात तरतूद आहे त्या तरतूदी प्रमाणे कामकाज चालू आहे. स्टॅंडींग कमिटीने केलेले बजेट महासभेने ॲप्रुव्ह केलेले नाही त्या आयुक्तांनी अंदाज देताना आयुक्तांच्या अंदाजामध्ये जो काही निधी सन्मा.सदस्यांसाठी निर्देशित केला होता. त्या निधीप्रमाणे सध्या आपण काम करतो.

**प्रशांत दळवी :-**

बजेट मा.महासभेपुढे गेले नाही. मग स्टॅंडींगने जी मान्यता दिलेली आहे. ते निष्काशित करण्यांत आले का? स्टॅंडींगने केलेल्या बजेटला काय व्हॅल्यु नाही का?

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

मा.सभापती महोदय, स्टॅंडींगने केलेल्या बजेटला व्हॅल्यु आहे. बजेट स्टॅंडींगने करायचे आहे. प्रोव्हायडेड दॅट महासभेने ते मान्य करणे. जोपर्यंत महासभा मान्य करत नाही. तोपर्यंत स्टॅंडींगने केलेले अंदाजपत्रक मंजुर झाल्याचे मानले जात नाही . म्हणून मा.आयुक्तांच्या अंदाजानुसार काम सुरू आहे. जर ती प्रोंव्हीजन ॲक्टमध्ये नसती आयुक्तांनी केलेले अंदाज जोपर्यंत महासभा मंजुर करत नाही तर आपले कोणतेच काम चालू झाले नसते.

**प्रशांत दळवी :-**

साहेब माझ्या असे निदर्शनास आले आहे की ज्यावेळी स्टॅंडींगने मान्यता दिली त्यानंतर आजमितीस ते बजेट स्टॅंडींगच्या मान्यतेनुसारच चालू आहे. फक्त नगरसेवकाचा निधी कट करणे ह्याच्यापलिकडे मा.आयुक्तांनी काहीच केले नाही. माझ्या माहितीप्रमाणे सदस्याची पत्र गेलेली आहेत. काही पत्रांवर डिसीजन झाले आहे. आणि त्यांना तशी वर्क ऑर्डर देण्यांत आली आहे. आता जे सदस्य विचारणा करतात त्यांचे असे म्हणणे आहे. ११.५० लाख प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी म्हणून केलेले आहे. स्टॅंडींगने बनवलेले १० लाख आणि प्रभाग १५ त्यामधली काही पत्र गेली त्यांना मंजुरी पण देण्यांत आली आहे. मग त्याचे कसे करणार.

**मा. सभापती :-**

जी काम झाली आहेत त्याचे जबाबदार कोण.

**प्रशांत दळवी :-**

बाकीचे सदस्य काय करणार?

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब कोणताही नगरसेवक कोणताही निधी सांगत असेल प्रभाग हा हेड आहे. प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी हा नावाला आहे. हा व्यक्तीगत नाही. अखेर सार्वजनिक कामासाठी मनपा हद्दीत मनपाच्या नजरेखालीच काम होतील. मन कोणाची कलूशीत ठेवण्यापेक्षा डिपार्टमेन्टनी समन्वय ठरवून आम्हाला घ्यायचे नाही. स्टॅंडींगच्या सदस्याचा मान राखण्यासाठी सभागृहातल्या सर्व सदस्यांचा सन्मान ठेवण्यासाठी आणि हा मेसेज उगाच पत्रकारापर्यंत पाठवण्यापेक्षा ह्यातला कोणताही नगरसेवक त्यातला एक रूपया घरी नेत नाही. व्यक्तीगत काम करत नाही. मनपाच्या नियमानुसार होते. तुमच्या हेडमध्ये प्रभाग निधी लिहिलेले आहे. टोटल २५ लाख खर्च होईल. त्याच्यात कमीजास्त होईल. सुचवलेली काम व्हावी अस आमचे मत आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

उतना अधिकार हमारे पास रहने दो।

**मा. सभापती :-**

हा नगरसेवकांचा हनन होणारा विषय आहे. नगरसेवक ह्या २५ लाखामध्ये नागरीकांनी सांगितलेली काम उद्या करू शकतो. बाकी आता ह्यामध्ये बरेचसे नगरसेवक असे बोलायला आहेत की आता त्यांना वरती गेल्यानंतर सांगतात तुमच बजेटच नाही, काम होणारच नाही. त्या २५ लाखामध्ये लोकांनी सांगितलेली काम करतो. २५ लाखामध्ये अर्धे देणार असतील तर आम्ही काम काय करणार?

**हंसुकुमार पांडे :-**

निधी कॅन्सलच करून टाका ना. जनरलमध्ये सगळी काम करून द्या.

**प्रशांत दळवी :-**

काही सदस्यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने त्यांच्या निविदा व अवलोकनला आपल्याकडे आले होते. आपण ते अवलोकन मंजूर केले. काही लोकांना निधी उपलब्ध करुन दिला गेला. काही वरती अन्याय. माझी प्रशासनाला विनंती राहील ह्यावेळचे बजेट जोपर्यंत महासभेपूढे येत नाही स्टॅंडींगनी जी मंजूरी दिली आहे त्या मंजूरी प्रमाणे ...............

**वंदना पाटील :-**

मा. सभापती महोदय मी एक काम टाकलेल प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी प्रभागमध्ये तो निधी पास झाला ते मी विचारायला गेले की हे काम का घेतले नाही. तर खांबित साहेबांनी सांगितले की तुमचा निधी लॅब्स झाला. मला उत्तर हव आहे की, निधी लॅब्स कधी होते.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते मिटींग सुरु होण्यापूर्वी मा. आयुक्तांकडे सभापतींची चर्चा झाली १५ मार्चपर्यंत निधी आहे तिथपर्यंत लॅब्स होत नाही.

**वंदना पाटील :-**

तेच मला ऐकायचे आहे की लॅप्स होत नाही मी २००७ पासून निवडून आल्यानंतर तो रोड टाकलेला आहे. तिथे लाईन बनणार सिव्हरेज लाईन टाकणार आणि मला लेटर येते की दर पावसानंतर सुरु होणार. गेल्यावर्षी मला लेटर आले की, तिथे सिव्हरेज लाईन होणार नाही. सभापती साहेब माझे ते काम घ्या अशी मी रिक्वेस्ट करते.

**मा. सभापती :-**

पहिला प्रश्न होता निधी लॅब्स होते की नाही. त्याचे उत्तर बारकुंड साहेबांनी दिली की निधी मार्च पर्यंत लॅब्स होऊ शकत नाही. तुमचे ते काम होईल विषय संपला वाकोडे साहेबांशी बोलून पण झाले. त्यांनी सांगितले सिव्हरेज लाईन येणार नाही त्याच्यामुळे ते काम होईल.

**वंदना पाटील :-**

मा. सभापती साहेब अधिकारी असे उत्तर देतात तर त्याच्यावर काय ॲक्शन घेणार.

**राजेंद्र जैन :-**

मा.सभापती महोदय, यह सिव्हरेज का काम है। वाकोडे साहब पुरा लिस्ट कहाँ काम होनेवाला है नई सडक नगरसेवक को मालूम नही की वहाँ सिव्हरेज का काम आनेवाला है। नगरसेवक रोड का काम देता है। निधी के अंदर और दो महिने बाद यह लोग आके फोड देते है। सिव्हरेज के काम के लिए तो उनका प्लानिंग रहना चाहिए की कब सिव्हरेज का काम चालू होगा ताकि हम अपना प्लानिंग कर सके।

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, आपण कुठेतरी विषयांतर करतो. आमच्या सदस्याची जी काही सुचना होती.

**वंदना पाटील :-**

आम्ही जी उत्तर दिली आहेत तीच सांगतो.

**प्रशांत दळवी :-**

सन्मा.सदस्या आपण बोलायच्या अगोदर माझा जो विषय होता. जो निधीचा विषय आहे. स्टॅंडिंग कमिटीच्या सदस्याच्या भावना आपण मा. आयुक्तांपर्यंत पोहोचवाव्या आणि त्यातून काही मार्ग निघू शकेल.

**मा.सभापती :-**

स्टॅंडिंग कमिटी सदस्य नाही १०५ सदस्यांचे.

**प्रशांत दळवी :-**

स्थायीने जे बनवले आहे ते.

**मा. उपायुक्त :-**

मा.सभापती महोदय आपले म्हणणे आणि भावना मला दोन्ही मान्य आहे. कायदेशीर अडचण आहे त्यामुळे ते मंजुर करता येत नाही. तुमचे म्हणणे मी मा.आयुक्तां समोर ठेवतो. तुमचे अगोदरचे जे म्हणणे होते ते विचार करण्यासारखे आहे. जो पर्यंत ही चर्चा झाली नाही तोपर्यंत काही लोकांच्या फाईल मंजुर झाल्या जे मागे राहीले त्यांच्या पेन्डींग राहील्या.

**अनिता पाटील :-**

मंजुर झाला त्याचा आम्हांला विरोध नाही. पण तुम्ही साहेबांना असे सांगा की बाकी नगरसेवकांचे पण २५ लाख होऊ द्या.

**प्रकरण क्र. ८७ :-**

दि. ११/०७/२०१४ व दि. १८/०७/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८३ :-**

दि. ११/०७/२०१४ व दि. १८/०७/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर** **अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८, (भाईंदर पूर्व) गोडदेव आरक्षण क्र. २५९ (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) जागा भाड्याने देणेस मान्यता देणे.

**राजेंद्र जैन :-**

सदरचा विषय धोरणात्मक असल्यामुळे त्यावर महासभेमध्ये विचार विनिमय करुन धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. करीता सदरचा विषय महासभेपुढे धोरण ठरविण्याकरीता शिफारस करीत आहे असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ८८ :-**

(भाईंदर पूर्व) गोडदेव आरक्षण क्र. २५९ (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) जागा भाड्याने देणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. ८४ :-**

सदरचा विषय धोरणात्मक असल्यामुळे त्यावर महासभेमध्ये विचार विनिमय करुन धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. करीता सदरचा विषय महासभेपुढे धोरण ठरविण्याकरीता शिफारस करीत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८९, आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ४७ मधील रा.म. क्र. ०८ जवळील घोडबंदर गांव येथील अमृतेश्वर शंकर महादेव मंदीरा जवळील संरक्षण भिंत दि. ०६/०९/२०१४ रोजी सुमारे पहाटे ३.३० वाजता अचानक कोसळली. सदर कामांना मा.स्थायी समिती सभा दि. ०९/०९/२०१४ ठराव क्र. ८२ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार कामास सुरुवात करण्यात आली. अंदाजपत्रकात २७.०० मी. लांबीची कुंपणभित धरण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात जुनी पडलेली भिंत तोडून काढतांना भिंतीच्या पायथ्याशी पाण्याचे झरे असल्याचे निदर्शनास आले. सदर झऱ्यामुळे सदर कुंडात बारा महिने पाणी राहते. सदर झरे बुजू नये यासाठी कुंपणभिंतीचा पाया ३.०० मी. पुढे सरकविण्यात आल्या. यासाठी आर.सी.सी. सल्लागाराकडून नव्याने भिंत डिझाईन करून घेण्यात आली व रस्त्याची रूंदी कमी होणार नाही याची दक्षता घेण्यात आली. सदर वाढीव कामामुळे रू. ५,५४,११९/- रकमेची कामात वाढ होणार आहे. त्यामध्ये माती भराव ही अंदाजपत्रकात नसलेल्या बाबींचा अतिरिक्त बाब म्हणुन समावेश करावा लागणार आहे. त्यामुळे संरक्षक भिंतीचे मुळ अंदाजपत्रक रू. ३३,९२,९००/- ऐवजी रू. ५,५४,११९/- वाढ होऊन सुधारीत रू. ३९,४७,०१९/- रकमेचे अंदाजपत्रक होत आहे. तसेच सदर भिंती लगतच्या दोन्ही भिंतीस व पायवटांना तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तांत्रिक सल्लागार यांना बोलावुन समक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले. सदर अस्तित्वातील भिंतीला जोडण्यासाठी प्रत्येकी १५.०० मी. लांबीच्या संरक्षक भिंती बांधाव्या लागतील. यासाठी रू. २०,९३,५००/- एवढा येत आहे. सदर जुन्या भिंती कधीही पडतील व त्यामुळे जिवित व वित्तहानी होण्याचा संभव देखील होऊ शकतो. तरी वरीलप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रकास व रू. २०,९३,५००/- रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ८९ :-**

आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ८५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ४७ मधील रा.म. क्र. ०८ जवळील घोडबंदर गांव येथील अमृतेश्वर शंकर महादेव मंदीरा जवळील संरक्षण भिंत दि. ०६/०९/२०१४ रोजी सुमारे पहाटे ३.३० वाजता

अचानक कोसळली.. सदर कामांना मा.स्थायी समिती सभा दि. ०९/०९/२०१४ ठराव क्र. ८२ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार कामास सुरूवात करण्यात आली. अंदाजपत्रकात २७.०० मी. लांबीची कुंपणभित धरण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात जुनी पडलेली भिंत तोडून काढतांना भिंतीच्या पायथ्याशी पाण्याचे झरे असल्याचे निदर्शनास आले. सदर झऱ्यामुळे सदर कुंडात बारा महिने पाणी राहते. सदर झरे बुजू नये यासाठी कुंपणभिंतीचा पाया ३.०० मी. पुढे सरकविण्यात आल्या. यासाठी आर.सी.सी. सल्लागाराकडून नव्याने भिंत डिझाईन करून घेण्यात आली व रस्त्याची रूंदी कमी होणार नाही याची दक्षता घेण्यात आली. सदर वाढीव कामामुळे रू. ५,५४,११९/- रकमेची कामात वाढ होणार आहे. त्यामध्ये माती भराव ही अंदाजपत्रकात नसलेल्या बाबींचा अतिरिक्त बाब म्हणुन समावेश करावा लागणार आहे. त्यामुळे संरक्षक भिंतीचे मुळ अंदाजपत्रक रू. ३३,९२,९००/- ऐवजी रू. ५,५४,११९/- वाढ होऊन सुधारीत रू. ३९,४७,०१९/- रकमेचे अंदाजपत्रक होत आहे. तसेच सदर भिंती लगतच्या दोन्ही भिंतीस व पायवटांना तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तांत्रिक सल्लागार यांना बोलावुन समक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले. सदर अस्तित्वातील भिंतीला जोडण्यासाठी प्रत्येकी १५.०० मी. लांबीच्या संरक्षक भिंती बांधाव्या लागतील. यासाठी रू. २०,९३,५००/- एवढा येत आहे. सदर जुन्या भिंती कधीही पडतील व त्यामुळे जिवित व वित्तहानी होण्याचा संभव देखील होऊ शकतो. तरी वरीलप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रकास व रू. २०,९३,५००/- रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

*प्रकरण क्र. ९०, आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)*

**प्रशांत दळवी :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका तर्फे साकेत ठाणे व भाईंदर (पुर्व) फाटक येथे पंपगृह बांधण्यात आलेले आहे. तसेच साकेत येथुन MIDC मार्फत २० द.ल.ली पाणी पुरवठा On Line Booster पंपाद्वारे २६ ऑगस्ट २०१४ पासुन सुरु करण्यात आलेला आहे. तरी उपरोक्त कामाच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीकरिता निविदा मागविणाची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | ठाणे साकेत येथील पंपगृहाचे वार्षिक देखभाल दुरुस्तीबाबत. | रू. ३६,७३,०००/- |
| २ | भाईंदर (पुर्व) फाटक येथील पंपगृहाचे वार्षिक देखभाल दुरुस्तीबाबत. | रु. ३६,७३,०००/- |

तरी वरील कामे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**राजेंद्र जैन :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**राजेंद्र जैन :-**

वाकोडे साहेब जब भी बांधकाम का पत्रिका आता है उसमे खोदने का कितना, कितना लगाने का, कितना कि.मी. है उसका जानकारी चाहिए। पिछले दो साल में पानी की बहुत सी सुविधाए मंजुर की पर पानी के अंदर हमारा ज्ञान अत्यल्प है। सुविधा जो आती है उसकें अंदर उसका वर्क ऑर्डर उसका वार्षिक खर्चा ३६ लाख ७३ आप ४० बोलते हो। ४५ बोंलते हो हमारा सामान्य ज्ञान बढता नही की इतना खर्चा कैसे आता है। इसका डिटेल बताइए।

**हंसुकुमार पांडे :-**

साल कभी से कभी तक पकडते हो।

**सुरेश वाकोडे :-**

सभापतीच्या परवानगीने बोलतो ही जी निविदा आहे. २० एम.एल.डी. पाणी २६ ऑगस्टपासून सुरू झालेले आहे. हे पाणी सुरू केले तर कॉन्ट्रक्टरला पुढच्या एक वर्षासाठी त्यासाठी आपल्याला ऑपरेटर मेन्टनेन्स ठेवायला लागेल एक पंप ऑपरेटर ठेवायला लागेल. त्याचे हेल्पर ठेवायला लागतील, इलेक्ट्रीशीयन ठेवायला लागतील. पंप दररोज डिस्चार्ज झाला त्याचा रेकॉर्ड ठेवणे. त्याच्यात काही मायनर रिपेअरींग असतात काही ठिकाणी ऑयलींग करणे काही त्याचे पार्ट गेले. तेवढे रिप्लेसमेंट हा सर्व खर्च ................

**राजेंद्र जैन :-**

उसका कॉपी होगा जिसको अलग अलग हेडींग दिए होगे। उसका एक कॉपी दे दो।

**सुरेश वाकोडे :-**

आता फक्त आर्थिक प्रशासकीय मंजुरी घेतो.

**राजेंद्र जैन :-**

हम २ साल ३ साल एक्सपिरियन्स लेके निकल जाएगे तो कम से कम उतना तो ज्ञान हो तो काम आएगा। किसके लिए क्या खर्चा होता है हमको मालूम पडेगा। तो अगली स्थायी समिती में उसका विवरण मिलना चाहिए।

**सुरेश वाकोडे :-**

मी आपल्याला कॉपी देतो.

**प्रकरण क्र. ९० :-**

आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८६ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका तर्फे साकेत ठाणे व भाईदर (पुर्व) फाटक येथे पंपगृह बांधण्यात आलेले आहे. तसेच साकेत येथुन MIDC मार्फत २० द.ल.ली पाणी पुरवठा On Line Booster पंपाद्वारे २६ ऑगस्ट २०१४ पासुन सुरु करण्यात आलेला आहे. तरी उपरोक्त कामाच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीकरिता निविदा मागविणाची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | ठाणे साकेत येथील पंपगृहाचे वार्षिक देखभाल दुरुस्तीबाबत. | रू. ३६,७३,०००/- |
| २ | भाईंदर (पुर्व) फाटक येथील पंपगृहाचे वार्षिक देखभाल दुरुस्तीबाबत. | रु. ३६,७३,०००/- |

*तरी वरील कामे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय* मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१, निवीदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**हंसुकुमार पांडे :-**

उसमें गटर का जो दिया है उसका कोई भी साईज नही दिया खाली निविदा मंजुर.

**रोहिदास पाटील :-**

दि.१४/०८/२०१४ रोजीच्या दै. यशोभुमी/ दै. मिड डे, दि.११/०८/२०१४ रोजीच्या दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवभारत व दि. २२/०८/२०१४ दै. दि. फ्रि प्रेस जर्नल/ दै. लोकसत्ता या वृत्तपत्रात व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदाराने मुदतीत निविदा सादर केल्या आहेत.

| अ क्र. | टेंडर आय.डी | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २२२५३ | मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओसवाल पॅराडाईज इमारत क्र. ३ ते एन.एच. स्कूल सर्कल पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. (फेर निविदा)<br>१. मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br>२. मे. एॅम.एस. इंटरप्रायझेस<br>३. मे. महेश्वर बिल्डर्स | रु.४१,४२,८००/-<br>अंदाजपत्रकीय दराने दरवाटाघाटीनंतर<br>१.००% कमी दराने<br>४.००% जास्त दराने<br>३.००% जास्त दराने | दि. ११/६/२०१४ | दै. यशोभुमी/ दै. मिड डे दि. १४/८/२०१४ | दि. १०/१०/२०१४ | दि. १४/८/२०१ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २२२३२ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील भाईंदर (प.) नाझरेथ आगारकडे जाणारा पोल क्र. XUG/००४/०६७ ते पोल क्र. XUG/००४/०४६ पर्यत रस्तांचे बांधकाम करणे. (दलित वस्ती अनुदान)<br>१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>२. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं<br>३. मे. राठोड ब्रदर्स | रु.३३,२८,७००/-<br>१४.५२ % कमी दराने<br>१३.५ % कमी दराने<br>१२.५१ % कमी दराने | दि. १७/६/२०१४ | दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवभारत दि. १०/८/२०१४ | दि. १०/१०/२०१४ | दि. ११/८/२०१ |
| ३ | २२२३१ | भाईंदर (प.) मुर्धा सदानंद नगर येथे नाल्याचे बांधकाम करणे (दलित वस्ती अनुदान)<br>१. मे. राठोड ब्रदर्स<br>२. मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>३. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं<br>४. मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस<br>५. मे. राठोड असोसिएटस् | रु.४८,६९,२००/-<br>१४.८८ % कमी दराने<br>११.८५ % कमी दराने<br>१२.०६ % कमी दराने<br>६.३ % कमी दराने<br>८.११ % कमी दराने | दि. १७/६/२०१४ | दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवभारत दि. १०/८/२०१४ | दि. १०/१०/२०१४ | दि. ११/८/२०१ |
| ४ | २२२३० | भाईंदर (प.) मुर्धा रेव आगार येथे शौचालया पासुन ते मुर्धा सदानंद नगर पर्यत नाल्याचे बांधकाम करणे. (दलित वस्ती अनुदान)<br>१. मे. राठोड ब्रदर्स<br>२. मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>३. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं<br>४. मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस | रु.४९,०४,७००/-<br>१४.८८ % कमी दराने<br>११.७५ % कमी दराने<br>१२.०६ % कमी दराने<br>६.३ % कमी दराने | दि. १७/६/२०१४ | दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवभारत दि. १०/८/२०१४ | दि. १०/१०/२०१४ | दि. ११/८/२०१ |
| ५ | २२२८१ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ज्युपिटर इमारत ते कॉर्पोरेशन बँक पर्यत सी. सी. गटार बांधून स्लॅब टाकणे तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच स्कूल रस्त्यावरील ओस्तवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड २ पर्यत सी. सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. (फेर निविदा)<br>१.मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br>२.मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>३.मे. महेश्वर बिल्डर्स | रु. ८७,६९,४००/-<br>अंदाजपत्रकीय दराने दरवाटाघाटीनंतर ३.००% कमी दराने<br>४.०० % जास्त दराने<br>३.०० % जास्त दराने | दि. ०८/७/२०१४ | दै. दि. फ्रि प्रेस जर्नल/ दै. लोकसत्ता दि. २२/८/२०१४ | दि. २०/१०/२०१४ | दि. २५/८/२०१ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | २२२५१ | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चौपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे. (फेर निविदा)<br><br>१.मे. पियुष इंटरप्रायझेस<br>२.मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस<br>३.मे. शिवम लँण्डस्केअर्स | रु.५६,५४,९८६/-<br><br>१८.००% जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर ८.००% जास्त दराने<br>२१.००% जास्त दराने<br>२७.००% जास्त दराने | दि. ११/६/२०१४ | दै. यशोभुमी/ दै. मिड डे दि. १४/८/२०१४ | दि. ३०/१०/२०१४ | दि. १४/८/२०१ |

वरील कामाच्या सर्वात कमी दराच्या निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**अश्विन कंसोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन है।

**प्रकरण क्र. ९१ :-**

निवीदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ८७ :-**

दि.१४/०८/२०१४ रोजीच्या दै. यशोभुमी/ दै. मिड डे, दि.११/०८/२०१४ रोजीच्या दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवभारत व दि. २२/०८/२०१४ दै. दि. फ्रि प्रेस जर्नल/ दै. लोकसत्ता या वृत्तपत्रात व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदाराने मुदतीत निविदा सादर केल्या आहेत.

| अ क्र. | टेंडर आय.डी | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २२२५३ | मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओसवाल पॅराडाईज इमारत क्र. ३ ते एन.एच. स्कूल सर्कल पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे.<br>(फेर निविदा)<br>१. मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br>२. मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>३. मे. महेश्वर बिल्डर्स | रु.४१,४२,८००/-<br><br>अंदाजपत्रकीय दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१.००% कमी दराने<br>४.००% जास्त दराने<br>३.००% जास्त दराने | दि. ११/६/२०१४ | दै. यशोभुमी/ दै. मिड डे दि. १४/८/२०१४ | दि. १०/१०/२०१४ | दि. १४/८/२० |
| २ | २२२३२ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील भाईंदर (प.) नाझरेथ आगारकडे जाणारा पोल क्र. XUG/००४/०६७ ते पोल क्र. XUG/००४/०४६ पर्यत रस्तांचे बांधकाम करणे.<br>(दलित वस्ती अनुदान)<br>१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>२. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं<br>३. मे. राठोड ब्रदर्स | रु.३३,२८,७००/-<br><br>१४.५२ % कमी दराने<br>१३.५ % कमी दराने<br>१२.५१ % कमी दराने | दि. १७/६/२०१४ | दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवभारत दि. १०/८/२०१४ | दि. १०/१०/२०१४ | दि. ११/८/२० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २२२३१ | भाईंदर (प.) मुर्धा सदानंद नगर येथे नाल्याचे बांधकाम करणे (दलित वस्ती अनुदान)<br>१. मे. राठोड ब्रदर्स<br>२. मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>३. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं<br>४. मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस<br>५. मे. राठोड असोसिएटस् | रु.४८,६९,२००/-<br>१४.८८ % कमी दराने<br>११.८५ % कमी दराने<br>१२.०६ % कमी दराने<br>६.३ % कमी दराने<br>८.११ % कमी दराने | दि. १७/६/२०१४ | दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवभारत दि. १०/८/२०१४ | दि. १०/१०/२०१४ | दि. ११/८/२० |
| ४ | २२२३० | भाईंदर (प.) मुर्धा रेव आगार येथे शौचालया पासुन ते मुर्धा सदानंद नगर पर्यत नाल्याचे बांधकाम करणे.<br>(दलित वस्ती अनुदान)<br>१. मे. राठोड ब्रदर्स<br>२. मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>३. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं<br>४. मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस | रु.४९,०४,७००/-<br>१४.८८ % कमी दराने<br>११.७५ % कमी दराने<br>१२.०६ % कमी दराने<br>६.३ % कमी दराने | दि. १७/६/२०१४ | दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवभारत दि. १०/८/२०१४ | दि. १०/१०/२०१४ | दि. ११/८/२० |
| ५ | २२२८१ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ज्युपिटर इमारत ते कॉर्पोरेशन बँक पर्यंत सी. सी. गटार बांधून स्लॅब टाकणे तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच स्कूल रस्त्यावरील ओस्तवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड २ पर्यंत सी. सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. (फेर निविदा)<br>१.मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br>२.मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>३.मे. महेश्वर बिल्डर्स | रु. ८७,६९,४००/-<br>अंदाजपत्रकीय दराने दरवाटाघाटीनंतर<br>३.००% कमी दराने<br>४.०० % जास्त दराने<br>३.०० % जास्त दराने | दि. ०८/७/२०१४ | दै. दि. फ्रि प्रेस जर्नल/ दै. लोकसत्ता दि. २२/८/२०१४ | दि. २०/१०/२०१४ | दि. २५/८/२० |
| ६ | २२२५१ | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चौपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे. (फेर निविदा)<br>१.मे. पियुष इंटरप्रायझेस<br>२.मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस<br>३.मे. शिवम लँण्डस्केअर्स | रु.५६,५४,९८६/-<br>१८.००% जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>८.००% जास्त दराने<br>२१.००% जास्त दराने<br>२७.००% जास्त दराने | दि. ११/६/२०१४ | दै. यशोभुमी/ दै. मिड डे दि. १४/८/२०१४ | दि. ३०/१०/२०१४ | दि. १४/८/२० |

वरील कामाच्या सर्वात कमी दराच्या निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरिया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९२, निवीदांना मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**प्रशांत दळवी :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्र.२३३ मधील उंच जलकुंभ तात्पुरत्या स्वरुपात पाणी वितरणकरिता ५०० मि.मी. व्यासाची डी.आय. के-७ जलवाहिनी पुरविणे व अंथरणे (तृतीय फेर निविदा) (अंदाजित रक्कम रू. ४९,८४,२०९/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | **१९.७८६% जास्त दराने.**<br>**(वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १०.००% जास्त दराने.)** |
| २) मे. आर.एस. कन्स्ट्रक्शन | २७.२७% जास्त दराने |

२) मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईदर (पूर्व) येथील गोडदेव जलकुंभास पाणी पुरवठा करणारी ५०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी ओम साई व कस्तुरी इंडस्ट्रियल इस्टेट येथे स्थानांतरीत करणे. (जलवाहिनी अंथरणे)
(अंदाजित रक्कम रू. ४९,३२,७५०/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | **१४.१२% जास्त दराने**<br>**(वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १०.००% जास्त दराने)** |

३) मिरा-भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र.२२६ इंद्रलोक फेज क्र.०४ मौजे नवघर येथे उंच जलकुंभ बांधणे. (फेर निविदा)
(अंदाजित रक्कम रू. २,२५,९५,००८/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. ग्लेग इंजिनिअर्स प्रा.लि. | **८.००% जास्त दराने**<br>**(वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ८.०० % जास्त दराने)** |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व २ च्या कामाकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** अ.क्र.३ च्या कामाकरीता **मे. ग्लेग इंजिनिअर्स प्रा.लि.** यांचे प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**राजेंद्र जैन :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**राजेंद्र जैन :-**

वाकोडे साहब जो मैं सवाल पुछुँगा वो आपका ही है। ये डी.सी.आर. रेट जानना है की ज्यादा रेट है। डी.सी.आर. रेट पुराना चल रहा है। हर जगह से हम लेते है तो कम करने की कोशिश करते है। यहाँ पर अपना १९.७/८ दर में आया है। तीन अलग अलग काम है। एक में १४ पॉईंट एक दो परसेंट एक में ८ परसेंट मैं मानता हूँ की ये काम विविध प्रकार के होगे। ये तोनो काम एक ही प्रकार के होंगे तो रेट कैसे आएगा अपना पास में। इसका कम आना चाहिए। उपर २७ परसेंट, २० परसेंट कभी कभी आता है। कभी आगे नही आता है। इसका रेट कम आ रहा है ज्यादा आ रहा है। डी.सी.आर. रेट नया आएगा की नही आएगा। ये आपको मालुम होगा।

**सुरेश वाकोडे :-**

हि निवीदा आपण ६ महिन्यापासून कंटीन्यू करतो.

**राजेंद्र जैन :-**

ये जो काम होता है। डी.सी.आर. रेट जो होता है। थाणा का या भाईंदर का या राज्य का। उसे वास्तव में १७ पॉईट १९ पॉईंट ज्यादा है। या आप बोलते की डी.सी.आर. रेट नविनीकरण नही किया गया है। इसलिए ज्यादा आ रहा है।

**सुरेश वाकोडे :-**

पाईपचे रेट वेगवेगळे असतात.

**राजेंद्र जैन :-**

हा साहब माना ना, यह डी.एस.आर. रेट कब का है।

**सुरेश वाकोडे :-**

मागच्या वर्षाचा आहे.

**राजेंद्र जैन :-**

तीनो एक प्रकार के है।

**सुरेश वाकोडे :-**

तीन वेगळी वेगळी काम आहेत.

**राजेंद्र जैन :-**

मैं एक ही बात सभापती महोदय कहना चाहता हूँ पाईप रेट बढ गए है। हर साल डिपार्टमेंट काम करते है। हर जगह काम करते है। डी.एस.आर. रेट का कितना बढाया उसका कही पे प्लस मायनस का सिस्टम नही है। हमको निश्चीत करना है यह ज्यादा है की कम है। हमारा प्रश्न यह है डी.एस.आर. का रेट इतना बढता है आप उसको स्विकार करते हो और बोलते हो नार्मल है। यह आपका जजमेन्ट है हमारा जजमेन्ट नही हुआ। आपने लिस्ट लाके दी अंदाजपत्रक में इतना बढा। आप बोल रहे मैं आप की बात समझ रहा हूँ की रेट बढ गए है।

**मा. सभापती :-**

आप जैसे बोल रहे है वह उन्होंने ऐसा किया हुआ रहता है। लेकिन आपके सामने नही रखा जैसी भी निविदा आएगी समझो १० परसेन्ट अबव्ह दिखता है यह १० परसेन्ट आज के मार्केट के हिसाब से समतुल्य तो उसमे अमेटमेन्ट करेंगे।

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब डी.आय.पी. सेव्हन म्हणजे काय? क्वालिटी आली.

**सुरेश वाकोडे :-**

डी.आय.पी. सेव्हन नाही के सेव्हन तो पाईपचा प्रकार आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण के सेव्हन वापरला आहे तो सुपीरियर वापरला आहे की सेकंड क्वालिटीचा वापरला आहे.

**सुरेश वाकोडे :-**

सुपीरियर क्वालिटी वापरली आहे.

**रोहिदास पाटील :-**

किती हाईटसाठी त्यांनी कोणती स्पेसिफिकेशन त्यांनी केले असेल ना की इतक्या हाईटला ही वापरा आपण जर ती कमी वापरली तर लगेच पुढच्या वर्षी इस्टीमेंट येईल.

**प्रकरण क्र. ९२ :-**

निवीदांना मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८८ :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्र.२३३ मधील उंच जलकुंभ तात्पुरत्या स्वरुपात पाणी वितरणकरिता ५०० मि.मी. व्यासाची डी.आय. के-७ जलवाहिनी पुरविणे व अंथरणे (तृतीय फेर निविदा) (अंदाजित रक्कम रू. ४९,८४,२०९/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | **१९.७८६% जास्त दराने.**<br>**(वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १०.००% जास्त दराने.)** |
| २) मे. आर.एस. कन्स्ट्रक्शन | २७.२७% जास्त दराने |

२) मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईदर (पूर्व) येथील गोडदेव जलकुंभास पाणी पुरवठा करणारी ५०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी ओम साई व कस्तुरी इंडस्ट्रियल इस्टेट येथे स्थानांतरीत करणे. (जलवाहिनी अंथरणे) (अंदाजित रक्कम रू. ४९,३२,७५०/-)

**ठेकेदाराचे नाव** **देकार**

१) मे. विंध्या ट्रेडर्स **१४.१२% जास्त दराने**
**(वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १०.००% जास्त दराने)**

३) मिरा-भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र.२२६ इंद्रलोक फेज क्र.०४ मौजे नवघर येथे उंच जलकुंभ बांधणे. (फेर निविदा) (अंदाजित रक्कम रू. २,२५,९५,००८/-)

**ठेकेदाराचे नाव** **देकार**

१) मे. ग्लेग इंजिनिअर्स प्रा.लि. **८.००% जास्त दराने**
**(वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ८.०० % जास्त दराने)**

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व २ च्या कामाकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** अ.क्र.३ च्या कामाकरीता **मे. ग्लेग इंजिनिअर्स प्रा.लि.** यांचे प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३, टेंबा रुग्णालयासाठी रुग्णालय सल्लागार (Hospital Consultant) नेमण्यासाठी पात्र ठरलेल्या निविदाकाराचे दर स्विकारण्यास मंजुरी मिळणेबाबत.

**राजेंद्र जैन :-**

टेंबा रुग्णालय हे किती खाटांचे आहे? त्यात कोणकोणत्या सोयीसुविधा आहेत? रुग्णालय मल्टी स्पेशेलिस्ट आहे किंवा कसे? तसेच त्यामध्ये फर्निचर, सामुग्री, मशनरी काय असेल याबद्दल काही तपशील नाही व माहिती नाही. सदरचे टेंबा रुग्णालय हे मिरा भाईंदर शहराचा मानबिंदू असेल. त्यामुळे त्याच्यावर सारासर विचार करणे आवश्यक आहे. याबाबींचा विचार करता मा. आयुक्त यांनी सर्व पदाधिकारी, गटनेते व स्थानिक लोकप्रतिनिधी यांची त्यांच्या दालनात बैठक बोलावुन त्यांच्याशी रुग्णालयासाठी काय करता येईल या बाबींवर चर्चा करुन घ्यावी. तद्नंतर सदरच्या विषयावर फेरनिविदा काढण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगांवकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ९३ :-**

टेंबा रुग्णालयासाठी रुग्णालय सल्लागार (Hospital Consultant) नेमण्यासाठी पात्र ठरलेल्या निविदाकाराचे दर स्विकारण्यास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ८९ :-**

टेंबा रुग्णालय हे किती खाटांचे आहे? त्यात कोणकोणत्या सोयीसुविधा आहेत? रुग्णालय मल्टी स्पेशेलिस्ट आहे किंवा कसे? तसेच त्यामध्ये फर्निचर, सामुग्री, मशनरी काय असेल याबद्दल काही तपशील नाही व माहिती नाही. सदरचे टेंबा रुग्णालय हे मिरा भाईंदर शहराचा मानबिंदू असेल. त्यामुळे त्याच्यावर सारासर विचार करणे आवश्यक आहे. याबाबींचा विचार करता मा. आयुक्त यांनी सर्व पदाधिकारी, गटनेते व स्थानिक लोकप्रतिनिधी यांची त्यांच्या दालनात बैठक बोलावुन त्यांच्याशी रुग्णालयासाठी काय करता येईल या बाबींवर चर्चा करुन घ्यावी. तद्नंतर सदरच्या विषयावर फेरनिविदा काढण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन** **अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९४, निवीदांना मान्यता देणे. महिला व बालकल्याण विभागामार्फत महिला / पुरुषांसाठी ड्रायव्हिंग प्रशिक्षण देणे.

**प्रशांत दळवी :-**

महिला व बालकल्याण विभागामार्फत महिला/पुरुष ड्रायव्हिंग या प्रशिक्षणासाठी ई-टेंडरींगव्दारे "मिड डे" व "संध्यानंद" या वर्तमान पत्रातील जाहिराती नुसार ऑन लाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | साईनाथ मोटार ट्रेनिंग स्कुल | जनता मोटार ट्रेनिंग स्कुल | प्रकाश शिंदे मोटार ट्रेनिंग स्कुल |
|---|---|---|---|---|
| १ | ड्रायव्हिंग प्रशिक्षण (महिला व पुरुष) | २८५० | २९०० | २९५० |

वरील तीन संस्थापैकी साईनाथ मोटार ट्रेनिंग स्कुल या संस्थेचे दर कमी आहेत. तसेच सदर ड्रायव्हिंग या प्रशिक्षणासाठी सदर निविदाधारकास एक वर्षाची मुदत राहील. तरी महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार सदर प्रशिक्षणासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

**हरिश्चंद्र आमगांवकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**राजेंद्र जैन :-**

टेंडरींग प्रक्रियाद्वारा निमत्तम प्रशिक्षण दर स्विकार किए जाए। लाभार्थी की यादी प्रकाशित कियी जाए। ठेकेदार को मिरा मनपा भुगतान सिधा अदा न करे। निमतन प्रशिक्षण दर लाभार्थी के बँक खाते में जमा कियी जाए। ठेकेदार लाभार्थी से निमतन प्रशिक्षण दर लेके प्रशिक्षण दे। ऐसी मेरी सुचना है।

**मा. उपायुक्त :-**

ऐसा नही कर पाएगें।

**मुन्नासिंग :-**

मा. सभापती साहब पिछली बार फॉर्म भरके लिया और किसीको कुछ नही मिला।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

मा.सभापतीच्या परवानगीने बोलतो आपण पैसे ठेकेदाराला देतो. लाभार्थीला पैसे देत नाही.

**वंदना पाटील :-**

मा. सभापती साहेब हे सगळं रोखण्यासाठी आपण सगळ्या नगरसेवकांना एक लेटर पाठवा की तुमचे ४-५ जणांची लेटर द्या आणि प्रशिक्षण करून घ्या.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो पर्सनल व्हेरीफाय केलं होतं. सगळ्या लाभार्थींना फोन केला होता.

**राजेंद्र जैन :-**

आप इ.सी.एस. करेंगे तो जरा भी गडबड नही होगा। प्रधानमंत्री मोदीजी का भी कहना है बँक खाते में जमा करो।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

इन्डीव्ह्युज्वल देता येत नाही.

**राजेंद्र जैन :-**

दे सकते है बिहार में हुआ है। सायकल का डायरेक्ट पैसे अकाऊन्ट में गए।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

ड्रायव्हिंग प्रशिक्षण आहे. आर.टी.ओ. चे पैसे भरायला लागतात. लायसन्सचे पैसे भरायला लागतात.

**राजेंद्र जैन :-**

कौनसा नियम बोलता है की नही होता है। ऐसा कौनसा कानून है।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेब मा.सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांच्यात काही दुमत नाही. परंतू कोणत्या केसमध्ये जेव्हा एखादी वस्तू खरेदी करायची आहे आणि ज्याचा रेट फिक्स आहे आणि ते खरेदी करून आणायचे आहे. मग तेव्हा आपल्याला देता येईल. हे प्रशिक्षण त्यांना घ्यायचे आहे. प्रशिक्षण देणारी संख्या वेगळी आहे. घेणारा विद्यार्थी वेगळा आहे. घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या खात्यात पैसे दिले तर तो प्रशिक्षण देणाऱ्याला पैसे देतो की नाही ते अजून एक वेगळे काम आपल्याला करायला लागेल. एखादी वस्तू वाटण्याचा विषय असला तर लाभार्थीला डायरेक्ट स्किम मध्ये देऊ शकतो.

**राजेंद्र जैन :-**

उसमे भी ऑब्जेक्शन था। सायकल खरेदी करेगा वह कैसे मालूम पडेगा। जो अप्लाई कर रहा है उसका लायसन्स बाद में मांग सकते हो।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

लायसन्स नही दिया तो क्या कर सकते हो।

**राजेंद्र जैन :-**

उनसे वसूल करेंगे।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**
हो नही सकता।
**राजेंद्र जैन :-**
ऐसा कानून नही की नही हो सकता।
**मा.उपायुक्त :-**
यह अट डाल देंगे जितने लोगों के लायसन्स आए है उनके ही पैसे मिलेंगे। क्योंकी उनकी जिम्मेदारी बनेगी।
**राजेंद्र जैन :-**
टेलरिंग का क्या होगा। ब्युटी पार्लर का कौनसा लायसन्स देंगे।
**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**
महिला व बालकल्याण समिती वह देख सकते है।
(सभागृहात गोंधळ)
**प्रशांत दळवी :-**
मा. सभापती साहेब, प्रशासनानी सदरची सुचना कायद्या अंतर्गत जे काही करता येईल ते करून मान्यता द्यावी.
**मा. सभापती :-**
ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.
**अनिता पाटील :-**
मा. सभापती साहेब नियमाप्रमाणे तुम्ही करा. परंतु नगरसेवकांच्या ४-४ लोकांना तरी प्रशिक्षण द्या. *गेल्यावर्षी लेटर दिल्यानंतर मॅडम बोलल्या निधी संपला.*
**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**
मा. सभापतीच्या परवानगी बोलतो, १० लाखाची तरतूद आहे. महिला व बालकल्याण समिती यादी फायनल करते.
**अनिता पाटील :-**
बरोबर आहे. लेटर दिल्यानंतर देखील निधी संपला तर आम्ही कुठे जायचे.
**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**
तरतूदच कमी आहे तर आम्ही काय करणार.
**अनिता पाटील :-**
निधी कमी आहे मग आम्ही प्रशिक्षण देऊ नये काय?
(सभागृहात गोंधळ)
**मा. सभापती :-**
पानपट्टे साहेब हा जो निधी दिला आहे तो स्टॅन्डीगच्या बजेटप्रमाणे आहे की मा. आयुक्तांच्या बजेटप्रमाणे दिला आहे.
**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**
त्याच्या अगोदर शासनाकडून यायचे.
**मा. सभापती :-**
सांगा तुम्ही.
**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**
तो विषय शासनाकडे निर्णयासाठी प्रलंबित आहे.
**मा. सभापती :-**
हा जो निर्णय दिला आहे. ही जी प्रोव्हिजन केली आहे ती स्टॅन्डीगच्या बजेटप्रमाणे केली आहे की आयुक्ताच्या बजेटप्रमाणे केली आहे.
**प्रशांत दळवी :-**
बजेट शासनस्तरावर प्रलंबित आहे.
**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**
आपण प्रस्ताव पाठवला आहे. त्याच्याकडून फायनल निर्णय आला नाही.
**मा. उपायुक्त :-**
त्यांचा प्रश्न बरोबर आहे हा जर आयुक्ताच्या अंदाजा व्यतिरीक्त देता येईल तर आपल्याला ठराव करता येणार नाही. दोन वेगळ्या भूमिका घेता येणार नाही. ते आपल्याला विड्रॉ करायला लागेल जर हे आयुक्तांच्या अंदाजाप्रमाणे असेल तरच हे काम करता येईल. सगळ्याच निविदा मंजुर करतो जी काम करतो इकडे वेगळी भूमिका असे चालणार नाही. आपल्याला कुठेतरी कन्फर्म राहायला पाहिजे की आपला अंदाज आहे त्याप्रमाणेच काम होणार. जर हे दोन्ही ठराव आपल्याला अंदाजाच्या व्यतिरीक्त असेल तर आपण स्थगित करू. आत्ता आपण ह्याच्यासमोर विड्रॉ करू.

**रोहिदास पाटील :-**

मा.सभापती साहेब, सभागृहाला माहिती देतो मनपाभी लोकांची गरज म्हणून ३.५० कोटी रू. खर्च करून अग्निशमन दलाच्या ६ गाड्र्या आणल्या. ६ गाड्या ४-५ महिने उभ्याच होत्या. उभ्या कशाला होत्या तर त्याचे रजिस्ट्रेशनच केले नाही त्या गाड्या आजही उभ्या आहेत. त्याची काय भूमिका आहे. मा.आयुक्त साहेब भाईंदर पूर्वेला दिवाळीच्या वेळेला ७ आगी लागल्या. एक आग संध्याकाळी ३.३० ला लागली. ती दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वा.पर्यंत चालली. एवढ्या वेळात ४ वेळा गाडी आली. गाडी आली आग विझवली गेली. भाईंदर पश्चिमेतून पूर्वेला यायला एक तास पण कमी पडतो. जिथे अडकली तिथे अडकली. ही गाडी जर वेळेत आली असती ती १५-१६ लाखाचे जे नुकसान झाले ते वेळेत आले असते. ५० हजार ते १ लाखात आटपले असते. आपण पूर्वेला गाडी मागतो. अग्निशमन केंद्र सुरू करा. आपण सगळ्यांनी मान्यता दिली. चालू केले. शेड तयार आहे. ज्याला बोलतात झीरो हवर्स म्हणजे कोणताही कॉल नाही. पण गाडी एकदम तत्पर आहे. अशी गाडी ठेवायला आग्रह करतो. पानपट्टे साहेब पुर्वेला गाडी उभी राहणार की नाही राहणार. मा. सभापती साहेब ह्या प्रोसिडींगमध्ये मी तुम्हाला सुचना देतो. आज शुक्रवार आहे. पुढच्या शुक्रवारच्या आधी पुर्वेला अग्निशमन केंद्र सुरू झाले नाही तर आमचा मंगळवारी २०० लोकांचा मोर्चा येईल हे सांगून ठेवतो, हा मोर्चा नागरीकांचा, कामगारांचा आणि कारखानदारांचा असेल आपण झोपून राहतो लोक त्याचा परिणाम भोगतात.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

मा.सभापतीच्या परवानगीने बोलतो, नवघरच्या पाण्याच्या टाकीच्या तिकडे शेड बांधलेली आहे. थोडे किरकोळ दुरूस्ती बाकी आहे. ६ गाड्या आहेत ३ अग्निशमन केंद्र आहे. आपल्याला मॅन पॉवर शॉर्टेज आहे. आम्ही आस्थापनेला पत्र दिले आहे. रिक्रुटमेन्ट करायला लागेल आणि गाडीही ठेवायला लागणार आहे. ते सुरू होईल.

**रोहिदास पाटील :-**

हा चेष्टेचा विषय नाही. प्रतिष्ठेचाही नाही. इच्छाशक्तीचा विषय आहे.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

इच्छाशक्ती आहे म्हणून आपण महासभेची मंजुरी घेतली.

**रोहिदास पाटील :-**

कॉल आल्यानंतर पश्चिमेकडून गाडी पूर्वेला येणार आमचे असे मत आहे. कॉल आलाच नाही तुम्ही तुमच्या अधिकारात पत्र द्या. ह्या गाड्या त्या ठिकाणी उभ्या राहायला पाहिजेत.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

म्हणूनच मंजुर करून घेतो.

**रोहिदास पाटील :-**

गाडी उभी करा.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

करतो. आपल्याकडे मॅन पॉवर नाही.

**रोहिदास पाटील :-**

मॅन पॉवरचा जो रस्त्यामध्ये वेळ जातो ती व्यक्ती पाच मिनिटात तिकडे पोहोचेल ना.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

बांधकामचे थोडेसे बाकी आहे.

**रोहिदास पाटील :-**

काही बाकी नाही. मी आज बघून आलो.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

सोमवार, मंगळवार पर्यंत होईल. ३ शिफ्टमध्ये एकच गाडी ठेवू शकतो.

**रोहिदास पाटील :-**

रात्री नका ठेवू. दोन शिफ्टमध्ये ठेवा मी तुम्हाला धन्यवाद देईन.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

३ अग्निशमन केंद्र आहेत. सगळीकडे ३ शिफ्टमध्ये माणसं ठेवायला लागतात. आपल्याकडे ९८ कर्मचारी आहेत. आता काम झालेले आहे. गाड्यापण आलेल्या आहेत मी ठेवतो.

**रोहिदास पाटील :-**

कधी?

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

सोमवार पासून एक गाडी दोन शिफ्टमध्ये.

**राजेंद्र जैन :-**

मा.सभापती महोदय जो आयुक्त साहबने बोला था उसको सुचनामे समावेश कर रहा हूँ। आयुक्त साहबने बोला है की कॉन्ट्रक्टरका पेमेन्ट तभी होगा जब वो अपने लाभार्थी का लायसन्स नगरपालिकेमें जमा करेगा।

**प्रकरण क्र. ९४ :-**

निवीदांना मान्यता देणे. महिला व बालकल्याण विभागामार्फत महिला / पुरुषांसाठी ड्रायव्हिंग प्रशिक्षण देणे.

**ठराव क्र. ९० :-**

महिला व बालकल्याण विभागामार्फत महिला/पुरुष ड्रायव्हिंग या प्रशिक्षणासाठी ई-टेडरींगव्दारे "मिड डे" व "संध्यानंद" या वर्तमान पत्रातील जाहिराती नुसार ऑन लाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | साईनाथ मोटार ट्रेनिंग स्कुल | जनता मोटार ट्रेनिंग स्कुल | प्रकाश शिंदे मोटार ट्रेनिंग स्कुल |
|---|---|---|---|---|
| १ | ड्रायव्हिंग प्रशिक्षण (महिला व पुरुष) | २८५० | २९०० | २९५० |

वरील तीन संस्थापैकी साईनाथ मोटार ट्रेनिंग स्कुल या संस्थेचे दर कमी आहेत. तसेच सदर ड्रायव्हिंग या प्रशिक्षणासाठी सदर निविदाधारकास एक वर्षाची मुदत राहील. तरी महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार सदर प्रशिक्षणासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी    अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**सदर ठरावात डॉ. राजेंद्र जैन यांनी सुचना मांडली आहे.**

१) टेंडरींग प्रक्रियाद्वारा निमतम प्रशिक्षण दर स्विकार किए जाए।
२) लाभार्थी की यादी प्रकाशित कियी जाए।
३) ठेकेदार को मिभा मनपा भुगतान सिधा अदा न करे।
४) निमतम प्रशिक्षण दर लाभार्थी के बँक खाते में जमा कियी जाए।
५) ठेकेदार लाभार्थी से निमतन प्रशिक्षण दर लेके प्रशिक्षण दे।

Payment to Contractor to be made only after debosity license.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९५, निवीदांना मान्यता देणे. महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांसाठी ब्युटीपार्लर प्रशिक्षण देणे.

**प्रशांत दळवी :-**

महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांसाठी ब्युटीपार्लर प्रशिक्षणासाठी ई-टेडरींगव्दारे "मिड डे" व "संध्यानंद" या वर्तमान पत्रातील जाहिराती नुसार ऑन लाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नाव | तपशिल | ई-टेंडरींगद्वारे सादर करण्यात आलेले दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | ब्युटीपार्लर प्रशिक्षण | सिध्दीविनायक महिला व बालकल्याण शैक्षणिक संस्था | ६५०० | - |
| | | श्रध्दा बालमहिला शिक्षण प्रसारक व समाजकल्याण संस्था | ५५०० | - |
| | | शगुन समाज विकास संस्था | ४४०० | ३२०० |

परंतु सदरचे दर जास्त आहेत. व पुर्ण माहिती गोषवाऱ्यात दिलेले नाही. त्यामुळे सदरची फेरनिविदा काढण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ९५ :-**

निवीदांना मान्यता देणे. महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांसाठी ब्युटीपार्लर प्रशिक्षण देणे.

**ठराव क्र. ९१ :-**

महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांसाठी ब्युटीपार्लर प्रशिक्षणासाठी ई-टेडरींगव्दारे "मिड डे" व "संध्यानंद" या वर्तमान पत्रातील जाहिराती नुसार ऑन लाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नाव | तपशिल | ई-टेंडरींगद्वारे सादर करण्यात आलेले दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | ब्युटीपार्लर प्रशिक्षण | सिध्दीविनायक महिला व बालकल्याण शैक्षणिक संस्था | ६५०० | - |
| | | श्रध्दा बालमहिला शिक्षण प्रसारक व समाजकल्याण संस्था | ५५०० | - |
| | | शगुन समाज विकास संस्था | ४४०० | ३२०० |

परंतु सदरचे दर जास्त आहेत. व पुर्ण माहिती गोषवाऱ्यात दिलेले नाही. त्यामुळे सदरची फेरनिविदा काढण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६, निवीदांना मान्यता देणे. महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांसाठी टेलरिंग प्रशिक्षण देणे.

**प्रशांत दळवी :-**

महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांसाठी टेलरिंग प्रशिक्षणासाठी ई-टेडरींगव्दारे "मिड डे" व "संध्यानंद" या वर्तमान पत्रातील जाहिराती नुसार ऑन लाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नाव | तपशिल | (E-tendring) व्दारे सादर करण्यात आलेले दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | टेलरिंग प्रशिक्षण | महाशक्ती जनजागृती शैक्षणिक संस्था | ४८०० | ३२०० |
| | | शगुन समाज विकास संस्था | ४९५० | - |
| | | श्रध्दा बालमहिला शिक्षण प्रसार व समाजकल्याण संस्था | ५८०० | - |

वरील तीन संस्थापैकी महाशक्ती जनजागृती शैक्षणिक संस्था या संस्थेचे दर कमी असल्याने त्यांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटी करण्यात आली व वाटाघाटी नंतरचे दर रु.३२००/- प्रति प्रशिक्षणार्थी करण्यात आले आहेत. तसेच सदर टेलरिंग प्रशिक्षणासाठी सदर निविदाधारकास एक वर्षाची मुदत राहील. तरी महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार सदर प्रशिक्षणासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर येत आहे.

**राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहेब टेलरिंग जो इन्स्टीट्युट है व कौनसे इन्स्टीट्युट सर्टीफाय है जो इनको सर्टिफिकेट देंगे उनका नाम क्या है। जो कॉलेंज टेलरिंग प्रशिक्षण दे रहे है। जब ड्रायव्हिंग प्रशिक्षण देते है तो उनका ड्रायव्हिंग लायसन्स देते है वैसे टेलरिंग इन्स्टीट्युट प्रशिक्षण देंगे वह प्रशिक्षण बराबर हुआ या नही उसको सर्टिफाय कौन करेगा।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

टेंडरींग मे जो डाला आहे।

**राजेंद्र जैन :-**

पिछले साल किस का सर्टिफिकेट लिया था।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

महाराष्ट्र गव्हरमेन्ट रजिस्ट्रेशन का जो संस्था रहता है उसमे ही प्रशिक्षण दिया था।

**राजेंद्र जैन :-**

तो संस्था का पूरा नाम क्या है।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

लास्ट टाईम टेलरिंग में ६-७ संस्था थी। सबका गव्हरमेन्ट रजिस्ट्रेशन था। और संस्था के नाम से ही सर्टिफिकेट जाता है।

**राजेंद्र जैन :-**

जो संस्था में मशिन होता है वही सर्टिफाय करते है। लास्ट टाईम पानपट्टे साहब से बात हुई थी जो संस्था टेलरिंग दे रहे है। दुसरी संस्था अलग इन्स्टीट्युटसे कोचिंग एक्झामिनेस्ट मंगाएगे ऐसी अपनी बात हुई थी।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

नही ऐसा नही।

**राजेंद्र जैन :-**

सभा में अपनी चर्चा हुई।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

ऐसा एक्झाम नही रहता।

**राजेंद्र जैन :-**

तो हम सर्टिफिकेट नही लेंगे। ऐसा दे देगे तो क्या सिखाते है उनका जाँच नही करेंगे।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

जाँच करते है।

**राजेंद्र जैन :-**

कैसे करते है।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

व्हिजीट करते है। बच्चे पढ रहे है की नही उसके लिए व्हिजीट करते है।

**राजेंद्र जैन :-**

आपने व्हिजीट किया।

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

मैने नही किया। समाज विकास अधिकारी ने किया।

**राजेंद्र जैन :-**

कितने नगरसेवक को दिखाने के लेके गए। हमने बार बार बोला था हमको लेके जाइए। आपने दिखाया नही प्रशिक्षण हो रहा है

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

सर हर वॉर्ड में जहाँ जहाँ प्रशिक्षण होता है वहाँ वहाँ हम लोग जाते है। वहाँ के नगरसेवक..............

**राजेंद्र जैन :-**

हम पुँछते है की हमारे वॉर्ड में कहाँ प्रशिक्षण दिया उसकी सुची नगरसेवक को दी की यहाँ पर प्रशिक्षण लगा जा रहा है।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

सर सुची दिया है।

**राजेंद्र जैन :-**

किसको दिया है।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

जिन नगरसेवकोका जहाँ से प्रशिक्षण हमने लिया है। उनका हर नगरसेवक को सामने हम लोगो ने रूम लेकर उनका ओपनिंग किया है और उनके हाथ से ही सर्टिफिकेट डिस्ट्रीब्युशन किया है।

**राजेंद्र जैन :-**

जिन नगरसेवक के एरिया का नही उसको इस बारे में मालूम नही पडेगा।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

सबको लेटर दिया था की ऐसा प्रशिक्षण दे रहे है।

**राजेंद्र जैन :-**

जो उद्घाटन क़िया उसकी जानकारी किसीके पास नही है। मेरे कहने का मतलब यह है की मेरा वेस्ट का जो एरिया है उधर किसी एल.पी.एल. या बि.पी.एल. को नही मिलता। तो मिरा भाईंदर मेंक्या चल रहा है किसी को मालूमही नही पडेगा। मुन्ना सिंग के वॉर्ड में ऐसा होना चाहिए हम देखते पुरा साल मैं बोलता रहा मैं पर्सनल आके मिला फीर भी आपने मुझे बुलाया नही कही न कही गडबड है।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

सर ऐसा कैसे गडबड होगा।

**राजेंद्र जैन :-**

फिर आप दिखती क्यू नही।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

सर सबको पता है। सबके एरिया में होता है।

**राजेंद्र जैन :-**

सबसे ज्यादा ध्यान मै देता हूँ मुझे ही मालूम नही है।

**गणेश देशमुख (मा.उपायुक्त (मुख्यालय)) :-**

अभी ऐसा करते है इस साल जो ट्रेनिंग चालू है कहाँ है कितनी बॅच जाएगी कौन जाएगा साहब को जरा विश्वास में लिजिए।

**मा.सभापती :-**

साहब को नही सभी को।

**राजेंद्र जैन :-**

टेलरिंग का कौनसा संस्था है।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

महाशक्ती जनजागृती शैक्षणिक संस्था।

**राजेंद्र जैन :-**

यह कहाँ पर है।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

भाईंदर में।

**राजेंद्र जैन :-**

रजिस्ट्रेशन कहाँ पर है।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

संख्या नोंदणी अधिनियम १८६० मुंबई सार्व. विश्वस्त व्यवस्थापन अधिनियम १९५० महाराष्ट्र सहकारी संस्थेचे अधिनियम १९६० दोन वर्ष पूर्ण संस्था नोंदणी.

**राजेंद्र जैन :-**

सोसायटी हुई।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

इसका रजिस्ट्रेशन गर्व्हमेंट के पास ही होता है।

**गणेश देशमुख (मा.उपायुक्त (मुख्यालय)) :-**

साहब आप बोल रहे हो उसका जवाब यह सर्टिफाय गर्व्हमेंट की कोई ऑथोराइज एजन्सी से नही होता। आप वेहीकल का प्रशिक्षण आरटीएस ऑथोरिटी वह इसमें नहीं रहता। ब्युटी पार्लर में जो संस्था ट्रेनिंग देती है उसका खुद का ऑथोराईजेशन रहता है। गर्व्हमेंट के साथ रजिस्ट्रेशन का वही संस्था उनको लेटर देती है।

**राजेंद्र जैन :-**

पिछली बार सजेशन दिया था उन सबकी एक फोटो नही निकाल सकते।

**मा. सभापती :-**

मॅडम तुम्ही फोटो का नाही काढत.

**राजेंद्र जैन :-**

पिछली बार सुचना किया था की फोटो होनी चाहिए।

**दिपाली पोवार (समाज विकास अधिकारी) :-**

जिनका प्रशिक्षण हुआ है उनका ग्रुप फोटो है।

**राजेंद्र जैन :-**

ग्रुप फोटो लाके दिखाओ।

**मा. सभापती :-**

ह्याच्यापुढे ग्रुप फोटो पाहिजे. डॉ. साहेबांची सुचना घ्या.

**प्रकरण क्र. ९६ :-**

निवीदांना मान्यता देणे. महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांसाठी टेलरिंग प्रशिक्षण देणे.

**ठराव क्र. ९२ :-**

महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांसाठी टेलरिंग प्रशिक्षणासाठी ई-टेडरींगव्दारे “मिड डे” व “संध्यानंद” या वर्तमान पत्रातील जाहिराती नुसार ऑन लाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नाव | तपशिल | (E-tendring) व्दारे सादर करण्यात आलेले दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | टेलरिंग प्रशिक्षण | महाशक्ती जनजागृती शैक्षणिक संस्था | ४८०० | ३२०० |
| | | शगुन समाज विकास संस्था | ४९५० | - |
| | | श्रध्दा बालमहिला शिक्षण प्रसार व समाजकल्याण संस्था | ५८०० | - |

वरील तीन संस्थापैकी महाशक्ती जनजागृती शैक्षणिक संस्था या संस्थेचे दर कमी असल्याने त्यांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटी करण्यात आली व वाटाघाटी नंतरचे दर रु.३२००/- प्रति प्रशिक्षणार्थी करण्यात आले आहेत. तसेच सदर टेलरिंग प्रशिक्षणासाठी सदर निविदाधारकास एक वर्षाची मुदत राहील. तरी महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार सदर प्रशिक्षणासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी          अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९७, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण आणि जखमी कुत्रे, पिसाळलेल्या कुत्र्यांचा औषधोपचार, बंदोबस्त करणे कामाच्या निविदेबाबत.

**राजेंद्र जैन :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये यापूर्वीच कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण याबाबत बऱ्याच वेळा निविदा काढून कार्यादेश देण्यात आले होते. त्यावेळी शहरामध्ये १०० टक्के कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण होईल असे आश्वासन देण्यात आली होती. सध्याची शहरातील परिस्थिती पाहता कुत्र्यांचे प्रजनन/संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यावरुन यापूर्वी केलेले काम योग्यरित्या केले नाही अशी आमची भावना आहे. सदर बाबींचा विचार करुन शहरातील कुत्र्यांचे १०० टक्के निर्बिजीकरण व लसीकरण कसे होईल व त्याकामी काय उपाययोजना करावी लागेल या करिता मा. आयुक्त सो. यांनी त्यांच्या दालनात सर्व पदाधिकारी, गटनेते व स्थानिक लोकप्रतिनिधी यांची बैठक बोलावुन त्यावर विचार विनिमय करावा. तद्नंतर सदरच्या विषयावर फेरनिविदा काढण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण आणि जखमी कुत्रे, पिसाळलेल्या कुत्र्यांचा औषधोपचार, बंदोबस्त करणे कामाच्या निविदेबाबत.

**ठराव क्र. ९३ :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये यापूर्वीच कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण याबाबत बऱ्याच वेळा निविदा काढून कार्यादेश देण्यात आले होते. त्यावेळी शहरामध्ये १०० टक्के कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण होईल असे आश्वासन देण्यात आली होती. सध्याची शहरातील परिस्थिती पाहता कुत्र्यांचे प्रजनन/संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यावरुन यापूर्वी केलेले काम योग्यरित्या केले नाही अशी आमची भावना आहे. सदर बाबींचा विचार करुन शहरातील कुत्र्यांचे १०० टक्के निर्बिजीकरण व लसीकरण कसे होईल व त्याकामी काय उपाययोजना करावी लागेल या करिता मा. आयुक्त सो. यांनी त्यांच्या दालनात सर्व पदाधिकारी, गटनेते व स्थानिक लोकप्रतिनिधी यांची बैठक बोलावुन त्यावर विचार विनिमय करावा. तद्नंतर सदरच्या विषयावर फेरनिविदा काढण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन          अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो भटक्या कुत्र्याचा विषय एकदम सेन्सेटीव्ह आहे. ह्या कामाकरिता पाच सफाई कामगार आहेत. माझा भ्रमणध्वनी सगळ्यांकडे आहे. माझ्या तर्फेच डायरेक्ट हा निरोप जातो आणि जी संस्था नेमण्यात आलेली आहे ती उत्तन तेथे निर्बिजीकरण व लसीकरणाचे काम करते. त्याची निविदा अत्यंत महत्वाची आहे. कारण २०१२ ला जे सेन्सेक्स झाले आहे त्याच्यात ८२७५ भटकी कुत्री आहेत ही जी निविदा केली त्याच्यात एक अट अशी घेतली की ३१ मार्चपर्यंत त्यांनी १०० टक्के मिरा भाईंदर क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे

निर्बिजिकरण करायचे आहे. ह्यापूर्वी अशी अट घालण्यात आलेली नव्हती. ही निविदा आपली शेवटची असणार आहे. त्यानंतर त्याचा जो २-३ महिन्याचा कालावधी असेल जून-जुलै पर्यंत त्यांनी विनामुल्य आपल्या शस्त्रक्रिया करुन द्यायची आहे. त्यामुळे हा विषय करणे गरजेचे आहे असे माझे मत आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय शेवटचा विषय झालेला आहे. सभा संपण्यापूर्वी माझी सर्व सन्मा. सदस्य, मा. आयुक्त महोदय सर्व प्रशासकीय अधिकारी प्रथमतः शिवसेना पक्षाचा एक सदस्य म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये निवडून आल्यानंतर पक्षाने दिलेली जबाबदारी सलग दोन वर्ष ह्या स्थायी समितीचा सदस्य म्हणून काम करत असताना येथील सर्व सन्मा. सदस्य, सभापती महोदय, सचिव साहेब, मा. आयुक्त महोदय सर्व प्रशासकीय सदस्यांनी अधिकाऱ्यांनी जे आम्हाला सहकार्य केले. आज आमचा शेवटचा दिवस आहे उद्या पक्षांनी परत जबाबदारी टाकली तर पुन्हा आमची भूमिका मांडू. पक्षाने दिलेली जबाबदारी सलग दोन वर्षे पार पाडत असताना अनेक प्रकारचे अडथळे आले परंतु काही अडथळे दूर करण्यासाठी सर्व सन्मा. सदस्यांना आणि अधिकाऱ्यांचा मौलाचा वाटा आहे. त्याचे मी पक्षातर्फे आभार मानतो आणि आमच्याकडून काही चूका झाल्या असतील त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. स्थायी समितीचा सदस्य म्हणून जरी आज निवृत्त होत असलो तरी ह्या मनपाचा सदस्य म्हणून कार्यरत असणार आहे. त्यामुळे प्रत्येक होणाऱ्या महासभेपुढे आम्ही सदस्य म्हणून आमचे म्हणणे मांडू आजपर्यंत जी मनपा अधिकाऱ्यांनी आणि सर्व सदस्यांनी आमच्या वॉर्डातल्या ज्या नागरीकांच्या समस्या होत्या त्या निराकारण करण्यासाठी जे काही मौलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी पुन्हा एकदा आदरणीय सभापती महोदय, आयुक्त महोदय सर्व अधिकाऱ्यांचे सन्मा.सदस्यांचे आभार व्यक्त करतो. धन्यवाद.

**मिरादेवी यादव :-**

मा.सभापती महोदय काशी स्कूल का कई बार विषय उठाया लेकीन आजतक समस्या हल नही हुई। उनका टॉयलेट का व्यवस्था नही हुआ, ना टीचर का हुआ, खिडकी का काच तुटा उसका भी व्यवस्था नही हुआ। पानपट्टे साहब बोले थे बगल में हॉस्पीटल बनी है। रूम खाली करेंगे वो रूम आजतक खाली नही हुआ। छुट्टी के दिन पानी के टाकी का साफसफाई होता है वह भी नही हुआ। टीचर का कुछ व्यवस्था नही हुआ। उनको आजतक शिपाई नही दिए गए। इसके बारें में ३-४ बार कम्प्लेन्ट किया लेटर दिया लेकीन कुछ भी व्यवस्था नही हुआ।

**गणेश देशमुख (मा.उपायुक्त (मुख्यालय)) :-**

विषय संपल्यावर सिटी इंजिनिअर बरोबर चर्चा करू.

**राजेंद्र जैन :-**

मेरा बहोत बडा प्रॉब्लेम है। सिव्हरेज लाईन डालने के बाद एस.पी.एम.एल. ने सडके बनाई। खांबित साहब ने हमको बार बार समझाया है की पानी इकठ्ठा होके रोड खराब होता है। सबका दो साल का डी.एल.पी. पिरीयड है। जहाँ जहाँ सडके बनी है उसका लेवल देखीए पानी डालके देखो पाणी इकठ्ठा होता है। एक बार साल में १० बार पॅचवर्क किया दो महिने के बाद वापीस पुरा टुट जाएगा। यह खर्चा कौन वसुल करेगा। सारे रोड नए बनने चाहिए।

**अनिता पाटील :-**

मा. सभापती साहेब स्टॅन्डींगमध्ये दोन वर्षे सभासद असताना अधिकाऱ्यांनी व स्टॅन्डींगच्या सर्व सदस्यांनी ज्या प्रमाणे प्रत्येक कामात, अडचणीत मदत केली त्याबद्दल त्यांचे धन्यवाद. मा.सभापती शरद पाटील साहेब ह्यांचं खास धन्यवाद. कारण आम्ही विरोधक असताना सुध्दा आम्हाला विरोधक न मानता आमच्या कामात साथ दिली त्याबद्दल त्यांचे धन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब गेली दोन वर्षे स्थायी समितीचे सदस्य म्हणून आम्ही लोकांनी आपल्याबरोबर काम केले. आपणही आमच्याबरोबर सभापती आणि सदस्य म्हणून केले. सभापतीच्या कार्यकाळामध्ये आपल्या पहिल्या मिटींगमध्ये पक्षधोरण म्हणून सांगितले होते की भाजपाचा सभापती असला १६ सदस्य कोणत्याही पक्षाचा कोणताही सदस्य असला तरी ह्या सभागृहात सन्मानीत आहे. आपल्या परीने ह्या शहराला न्याय देण्याच्या दृष्टिने विविध समस्यांवर चर्चा केली. काही प्रमाणात यश आले काही प्रमाणात खंत राहीली की आपण इतकी वर्षे पुन्हा पुन्हा प्रयत्न करून सुध्दा ते काम नीट मार्गी लागले नाही. आपल्याला यश आले नाही असे जरी असले तरी हे काम करतेवेळी कधी कधी सभागृहाच्या भावना म्हणून आम्ही अधिकाऱ्यांना आग्रह केला टोकाचा आग्रह केला. कधी बोलता एखाद्याचा आवाज कमी जास्त सुरात आम्ही बोलतो. मी स्वतः ही बोलतो. तरी सुध्दा अधिकाऱ्याने सहकार्य केले. त्यामुळे असे दिसून आले की आपण गावाला काय तरी देऊ शकलो. स्थायी समिती ह्या शहराला दिशा देणारी समिती आहे. सभागृह एक महिन्यांनी भरते. स्थायी समिती महिन्यातून चार वेळा बसते. प्रत्येकाला आपआपल्या प्रभागाचा विषय मांडायची संधी मिळते. सगळ्या पक्षाने आपल्या परिने मांडली. पक्षीय वातावरण टिकले. अधिकाऱ्याबरोबरच नातंही टिकले. मा.सभापतीने आपल्याला सहकार्य केले म्हणून मी पक्षाच्या वतीने आणि सगळ्याच्या वतीने मा.सभापतींला धन्यवाद देतो. आम्ही स्थायीच्या बाहेर जाणार. काही लोक स्थायी समितीत राहतील. पण तीन वर्षे आपण सभागृहात आहोत. आपण पक्ष कोणता जरी असला तरी आपली भूमिका पक्षाबरोबर प्रामाणिक ठेवावी आणि शहराचा विकासासाठी आपण एकत्र काम करावे. अशी अपेक्षा करतो, मा.

सभापती, मा. आयुक्तांना धन्यवाद देतो. सचिवांनीही आपल्या बाजू सांभाळून घेतल्या. त्यांनाही धन्यवाद देतो. धन्यवाद.

**गणेश देशमुख (मा.उपायुक्त (मुख्यालय)) :-**

मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्य जे स्थायी समितीतून निवृत्त होतील त्यांना प्रशासनाच्या वतीने शुभेच्छा.

**मा. सभापती :-**

सभापती म्हणून मी दोन शब्द बोलू इच्छितो ह्या सभागृहात सर्व सदस्य प्रशासकीय अधिकारी, मा. आयुक्त, मा. उपायुक्त, सचिव ह्या सगळ्यांनी सभापतीच्या काळात चांगले सहकार्य केले मी प्रयत्न केला की कोणाच्याही जोडीला दुजाभाव करायचा नाही. हा प्रयत्न केला आहे. ह्या प्रयत्नात कमी पडलो असेन. सगळे सदस्य आपल्या क्षमतेप्रमाणे बोलत असतात. देवसुध्दा १०० टक्के लोकांना सुखी ठेवू शकत नाही. मी देव नाही. एक व्यक्ती आहे. आणि त्या व्यक्तीच्या मनात कोणाला दुखावले असेल. कोणाच्या विषयाबद्दल म्हणेन जसे आमचे डॉ.साहेब बोलतात त्यांच्या सगळ्या गोष्टी खऱ्या असल्या तरी त्या आपण पूर्ण करू शकत नाही. डॉ.साहब आपका सब बात बहोत अच्छा रहता है। आप कायदेसे बोलते हो लेकीन सब कायदेसे करने जाएगे तो यह होनेवाला नही यह सभागृह है यहाँ सब चलते रहता है। आपकी जो मनभावना है की यह होना चाहिए सही बात है। होना चाहिए मोदी सरकार आयी है। आपकी सोच मोदी सरकारसे मिलती जुलती है। आगे ऐसा होता रहेगा और आगे ऐसा चलते रहेगा लेकीन आप ऐसा मत सोचिए की आपकी मजाक करते है। या मेरा कुछ सुनते नही। ऐसा आप मत सोचिए। एक साल मैं इस खुर्ची पे बैठा हूँ। इस खुर्ची पे बैठने के बाद कितने लोगो की नाराजगी देखनी पडती है। यह मैने देखा है। मैने किसीको नाराज किया होगा और किसीको जोरसे या ऊँचे आवाजसे बोला होगा तो मैं दिलगीरी व्यक्त करता हूँ। प्रशासनांनी, सचिवांनी सगळ्यांनी सहकार्य केल्याबद्दल सगळ्यांना धन्यवाद देतो.

**(सभा संपल्याची वेळ १.३० वाजता.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. विशेष स्थायी समिती सभा

# दि. ०९/१२/२०१४

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०९/१२/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०९/१२/२०१४ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. ०२/१२/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. दिलीप शिंदे, मा. अप्पर आयुक्त, कोकण भवन हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| २. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ४. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| ५. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ६. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ७. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ८. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ९. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| १०. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| ११. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सदस्य |
| १२. | श्रीम. नयना म. वसाणी | सदस्या |
| १३. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १४. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| १५. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य – निरंक</u>**

**नगरसचिव :-**

उपस्थित सर्वांचे स्वागत करुन मी सभापती निवडणूकीच्या कामाला सुरुवात करत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०९/१२/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १४, दि. ०२/१२/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ९८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१४-१५ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत. दि. ०४/१२/२०१४ रोजी नामनिर्देशन स्विकारण्याची वेळ दुपारी ३ ते ५ होती. त्यावेळेमध्ये ४ सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दिलेली आहेत. ती मी अनुक्रमे वाचून दाखवतो. १) श्री. केळुसकर प्रशांत नारायण २) श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर ३) श्री. पाटील नरेश तुकाराम आणि ४) श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार हे उमेदवार आहेत. दाखल केलेले चार नामनिर्देशन पत्र मी मा. पिठासीन अधिकाऱ्यांना छाननीसाठी सुपूर्त करीत आहे.

**पिठासीन अधिकारी :-**

स्थायी समिती पदासाठी जी नामनिर्देशन पत्र माझ्याकडे आली आहेत त्याच्यात श्री. केळुसकर प्रशांत नारायण, श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर, श्री. पाटील नरेश तुकाराम आणि श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार ही चार नामनिर्देशन पत्र प्राप्त झाली आहेत. चारही नामनिर्देशन पत्र वैध आहेत. उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यायची असेल त्यांना १५ मिनिटांचा कालावधी देण्यात येतो. ११ वाजून ०४ मिनिट झाली आहेत. ११ वाजून १९ मिनिटापर्यंत मागे घ्यायची आहेत. उमेदवारी मागे घ्यायची वेळ संपली आहे. श्री. हरिश्चंद्र आमगावकर आणि श्री. हंसुकुमार पांडे ह्या दोन उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणारे दोन उमेदवार रिंगणात उरले आहेत. श्री. केळुसकर प्रशांत नारायण आणि श्री. पाटील नरेश तुकाराम.

**नगरसचिव :-**

पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने अनुक्रमे श्री. केळुसकर ह्यांचे नाव प्रथम आहे. श्री. केळुसकर प्रशांत नारायण ह्यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. श्री. पाटील नरेश तुकाराम ह्यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**पिठासीन अधिकारी :-**

प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता दोन उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिले. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेतले असता (१) श्री. केळूसकर प्रशांत नारायण ह्यांना ०८ इतकी मते व (२) श्री. पाटील नरेश तुकाराम ह्यांना ०७ इतकी मते मिळाली. श्री. केळूसकर प्रशांत नारायण ह्यांना जास्त मते मिळाल्याने श्री. केळूसकर प्रशांत नारायण यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

**प्रकरण क्र. ९८ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१४-१५ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ९४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील प्रकरण २, कलम २१, पोटकलम (१) श्री. केळूसकर प्रशांत नारायण, (२) श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर, ३) श्री. पाटील नरेश तुकाराम व ४) श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार ह्यांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली. नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता (१) श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर, (२) श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार ह्यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिले. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेतले असता (१) श्री. केळूसकर प्रशांत नारायण ह्यांना ०८ इतकी मते (२) श्री. पाटील नरेश तुकाराम ह्यांना ०७ इतकी मते मिळाली.

**<u>श्री. केळुसकर प्रशांत नारायण ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-</u>**

१) डॉ. राजेंद्र भंवरलाल जैन
२) श्री. कासोदरीया अश्विन श्यामजी
३) सौ. मंदाकिनी गावंड
४) श्री. हरिश्चंद्र आमगावकर
५) श्री. प्रशांत एन. केळुसकर
६) श्रीम. नयना मनोज वसाणी
७) श्री. मोहन महादेव जाधव
८) श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील

**श्री. पाटील नरेश तुकाराम ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे
२) श्री. पांडे हंसूकुमार कमलकुमार
३) सौ. प्रभात प्रकाश पाटील
४) श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा
५) श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग
६) श्री. नरेश तुकाराम पाटील
७) श्री. सुहास माधवराव रकवी

| | | |
|---|---|---|
| **तटस्थ सदस्यांची नांवे –** | निरंक | |
| **मतदानावेळी एकूण हजर सदस्य** | :- | १५ |
| **श्री. प्रशांत नारायण केळूसकर ह्यांच्या बाजूने** | :- | ०८ |
| **श्री. नरेश तुकाराम पाटील ह्यांच्या बाजूने** | :- | ०७ |
| **तटस्थ** | :- | ०० |
| **अनुपस्थित सदस्य** | :- | ०० |
| **एकूण** | :- | १५ |

श्री. केळूसकर प्रशांत नारायण ह्यांना जास्त मते मिळाल्याने श्री. केळूसकर प्रशांत नारायण यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

**सही /-**
**पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

नवनिर्वाचित सभापतींचे मा. पिठासीन अधिकारी पुष्पगुच्छ देवून स्वागत करीत आहेत.

**पिठासीन अधिकारी :-**

ही निवडणूक प्रक्रिया संपल्याचे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दु. ११.२५ वा.)**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२८/७/२०१५

## //गोषवारा//

**प्रकरण क्रमांक** ( १४२ ) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करावयाच्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

राज्य शासनाच्या नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नव बौध्दासाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनसुचित जातीच्या राखीव प्रभागा शिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीमधील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा वस्त्यांमध्ये शासन निर्णय क्र. विघयो – १०२००००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि – ४, मंत्रालय, मुंबई – ४०००३२, दि.५ मार्च २००२ च्या शासन निर्णयानूसार नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतात. सदर योजनेच्या कामासाठी १००% अनुदान शासनाकडून प्राप्त होत असून मा. जिल्हाधिकारी मार्फत कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते. मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सदर योजने अंतर्गत करावयाच्या नागरी सुविधा विषयक कामांचे अनुसुचित जाती करीता आरक्षित असलेल्या प्रभागातून खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च रु. |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील मुर्धागावातील लक्ष्मीसदन ते शिवसाई निवास आणि विनायक भोईर यांच्या घराजवळ स्लॅबचे बांधकाम करणे व सी.सी. रस्ते बांधकाम करणे. | रू. ९,९१,६००/- |
| २ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील नाझरेथ आगर येथे सी.सी. पदपथाचे बांधकाम करणे. | रू. १०,४१,०००/- |
| ३ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील गांधीनगर व आंबेडकरनगर येथे सी.सी. गटार व सी.सी. पदपथाचे बांधकाम करणे. | रू. १२,८०,९००/- |
| ४ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील एम.बी.एम.सी. बस स्टॉप ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ११,७७,७७०/- |
| ५ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील कम्युनिटीहॉल ते पोल क्र.XUC/004/007 पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ४४,९२,१५०/- |
| ६ | भाईंदर (प.) आंबेडकरनगर समोर पोल क्र. XUC/004/007 ते पोल क्र. XUC/004/014 पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ४२,६१,६५०/- |
| ७ | भाईंर (प.) प्रभाग क्र. २७ आंबेडकरनगर समोर पोल क्र. XUC/04/014 ते XUC/004/020 पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ४६,६८,८००/- |
| ८ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील मुर्धा बगीच्या ते ब्रिजपर्यंत गटाराचे व स्लॅबचे बांधकाम करणे. | रू. २३,११,५००/- |
| ९ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील भोलानगर येथे गल्ली क्र.८,९,१०,११ मध्ये गटाराचे व स्लॅबचे बांधकाम करणे. | रू. २४,४६,१००/- |
| १० | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील सुभाषचंद्र बोस मैदान ते शौचालय पर्यंत रस्ता रूंदीकरण करणे. | रू. ३०,१७,५००/- |
| ११ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील मुर्धा ब्रिज ते इले. पोल क्र. XUC20/29 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे. | रु. ४६,४२,१००/- |
| १२ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील इले. पोल क्र. XUC20/29 ते इले. पोल क्र. XUC20/27 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे. | रु. ४५,५८,७००/- |
| १३ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील उत्तन कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्या लगत इले. पोल क्र. XUC20/27 ते इले. पोल क्र. XUC20/25 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे. | रु. ४५,७७,२१०/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील उत्तन कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्या लगत इले. पोल क्र. XUC20/25 ते इले. पोल क्र. XUC20/24 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे | रु. ४३,९२,१००/- |
| १५ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील उत्तन कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्या लगत मुर्धा येथे इले. पोल क्र. XUC20/23 ते इले. पोल क्र. XUC20/21 पर्यंत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे. | रु. ४४,७५,४००/- |
| १६ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील सुभाषचंद्र बोस मैदानालगत इले. पोल क्र. XUC20/11 ते इले. पोल क्र. XUC20/21 पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करणे. | रु. ३४,९६,६००/- |
| १७ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील उत्तन कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे इले. पोल क्र. XUC20/21 ते इले. पोल क्र. XUC20/31 पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करणे. | रु. ३६,१३,२००/- |
| १८ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील सुभाषचंद्र बोस मैदानासमोरील रस्त्याचे मजबुतीकरणासह पुर्नपृष्ठीकरण करणे. | रु. ४८,६१,६००/- |
| | **एकुण** | **रु.६,०३,०५,८८०/-** |

वरील कामे ही ५०.०० लक्ष रकमेच्या आतील असल्याने मा. स्थायी समिती सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

५/१/२०१५

**आयुक्त**

मिरा-भाईंदर महानगरपालिका

SN/14-15/GO-5

~~आत्मबारा नोट रजि~~. नं - ८७
मि ८/१/२०७५ ई.उ. ८०बाबा।

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सभा दि. २८/०१/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. १४३ सन 2014-15 या आर्थिक वर्षात उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने, स्मशाने, मैदाने व रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेकरीता लालमाती, शेणखत,व सफेदरेती पुरवठा करणेकामाच्या वार्षीक निविदेस मान्यता देणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने 57 उद्याने, 14 स्मशाने, 2 चौपाटया, 11 मैदाने व अंदाजीत 15 कि.मी लांबीचे डिवायडर विकसीत केलेले असून सदर ठिकाणी तसेच रोडच्या दुतर्फा वृक्षारोपन करणेकामी लालमातीची व शेणखत तसेच खेळणीसाठी सफेदरेती पुरवठा करणेकामाची आवश्यकता लक्षात घेता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामाची वार्षीक निविदा मागविणेकामी **मा.वृक्ष प्राधिकरण समिती सभा ठराव क्र. 7 दि. 16/08/2014** रोजी मान्यता देण्यात आली. सदर मान्यतेच्या अनुशंगाने **दै. नवकाळ व दै. मिड-डे या वृत्तप्रत्रात व ई-टेंडरींग प्रणालीव्दारे दि. 21/08/2014 रोजी** जाहिर **निविदा प्रसिध्द** करण्यात आल्या होत्या. सदर निविदेत मुदतीत **एकुण 3 निविदा** (मे.भुषण ट्रान्सपोर्ट, खुषबु इंटरप्रायजेस आर.एस.कंस्ट्रक्शन) **प्राप्त झाल्या** होत्या. सदर निविदांचे Technical Bid **मा. निविदा समिती समोर** दि. 12/11/2014 रोजी **सादर** करण्यात आले असता प्राप्त निविदा धारक खुशबु इंटरप्रायजेस, आर. एस. कन्सट्रक्शन या निविदाधारकांनी बगीचा विकसित करणे संदर्भातील अनुभव जोडला असल्याने सदर अनुभव ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे सदर निविदेतील मे. भुषण ट्रान्सपोर्ट हे **एकच निविदाधारक** अनुभवाची **अट पुर्ण करीत होता.** त्यामुळे सदरबाबत **फेरनिविदा मागविण्यात यावी** असा निर्णय दि. 12/11/2014 रोजी **मा. निविदा समितीमध्ये** घेण्यात आला.

सदर निर्णयानुसार **दि.18/11/2014 रोजी दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक** या वृत्तपत्रात तसेच **E-Tendering** प्रणालीद्वारे **जाहिर फेर निविदा** मागविण्यात आल्या. सदर निविदेची **मुदत दि. 19/11/2014 ते दि. 28/11/2014** या कालावधीत दुपारी **01.00** वाजेपर्यंत होती. सदर कालावधीत **एकच निविदा प्राप्त** झाल्यामुळे जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस **दि.01/12/2014 ते 03/12/2014 रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणालीव्दारे **प्रथम मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीत **दोन निविदा प्राप्त** झाल्याने जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस पुनःश्च **दि.04/12/2014 ते 06/12/2014 रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणाली व्दारे **व्दितीय मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीतही **दोनच निविदा प्राप्त** झाल्याने जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस पुनःश्च **दि.08/12/2014 ते 10/12/2014 रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणाली व्दारे **तृतीय मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीतही **दोनच निविदा प्राप्त** झालेल्या असून सदर निविदेचे **Technical Bid** उघडयात यावे किंवा कसे याबाबत आदेशार्थ सादर केले असता सदर फेरनिविदेस **अल्प प्रतिसाधामुळे तीन वेळा** मुदतवाढ देण्यात आली होती. सदर निविदेस दोनपेक्षा जास्त मुदतवाढ दिल्याने **दोन निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यास मा.अध्यक्ष निविदा समिती व मुख्यलेखापरिक्षक** यांनी **दि. 15/12/2014 रोजी मान्यता** दिली.

सदर मान्यतेनुसार निविदा धारकांची **Technical Bid दि. 17/12/2014** रोजी **उघण्यात आले** असता खालीलप्रमाणे दोन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत..

**1) मे. भुषण ट्रांन्सपोर्ट**

**2) मे. आर. एस. कन्स्ट्रक्शन**

वरीलप्रमाणे प्राप्त एकुण दोन निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया प्राप्त झाल्या असुन सदर निविदांची Financial Bid उघडणेबाबत मा. अध्यक्ष, निविदा समिती यांनी दि.20/12/2014 रोजी मंजुरी देण्यात आली. त्यानुसार दि.22/12/2014 रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता/ विवरणपत्र सोबत जोडले असुन त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सदर निविदेतील On-line पध्दतीने सादर करण्यात आलेले दर खालीलप्रमाणे.

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | लालमाती | सफेदरेती | शेणखत |
|---|---|---|---|---|
| 1. | मे. आर.एस. कन्स्ट्रक्शन | **रु.2223/- प्र.ब्रास** | **रु.4500/-प्र.ब्रास** | रु.2223/-प्र.ब्रास |
| 2. | मे.भुषण ट्रान्सपोर्ट | रु.2790/- प्र.ब्रास | रु.9875/- प्र.ब्रास | **रु.2080/- प्र.ब्रास** |

उपरोक्त तक्त्यातील कमी दराच्या निविदाधारकांना वाटाघाटीकरता दि. 30/12/2014 रोजी बोलिवले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर कमी केलेले आहेत.

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | लालमाती | सफेदरेती | शेणखत |
|---|---|---|---|---|
| 3. | मे. आर.एस. कन्स्ट्रक्शन | 2100/-प्र.ब्रास | 4200/- प्र.ब्रास | --- |
| 4. | मे.भुषण ट्रान्सपोर्ट | --- | --- | 1900/- प्र.ब्रास |

**सन 2014-15** या आर्थिक वर्षात **"माती शेणखत खरेदी"** पुरवठा करणे या लेखाशिर्षाखाली **रू. 60.00** (साठ लाख मात्र) लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच **सन 2015-16** करीता ही सदर लेखाशिर्षकात **तरतुद करण्यात येणार आहे.**

तरी उपरोक्त नमुद्प्रमाणे **मे. आर .एस. कंस्ट्रक्शन यांची लालमाती व सफेदरेती** पुरवठा करणेकामी व **भुषण ट्रान्सपोर्ट यांची शेणखत** पुरवठा करणेकामी वाटाघाटीनंतरच्या कमी दराच्या निविदा स्विकारण्यास **मा. निविदा समिती ने दि. 30/12/2014 रोजी शिफारस** केलेली आहे. व त्यास **मा.आयुक्त सो., यांनी दि. 31/12/2014 रोजी मंजुरी** दिलेली असून सदर **वार्षीक निविदेस** व त्याकामी येणाऱ्या खर्चास **मा. स्थायी समितीचे आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस** आहे.

**आयुक्त** 5/1/15
**मिरा भाईंदर महानगरपालिका**